# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२०

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**गुरुवार, दिनांक ०५ मार्च, २०२० / फाल्गुन १५, १९४१ (शके)**

| | |
|---|---|
| (१) गृह मंत्री<br>(२) महसूल मंत्री<br>(३) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री<br>(४) कृषी, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री<br>(५) रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री<br>(६) वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री | यांचे प्रभारी विभाग |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५५**

---

### राज्यात अंमली पदार्थांची तस्करी रोखण्याबाबत

**(१) * ६४६ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.मोहनराव कदम, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती स्मिता वाघ, डॉ.रणजित पाटील, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व नागपूरसह राज्यातील विविध ठिकाणी अंमली पदार्थांची मोठ्या प्रमाणात तस्करी होत असून दहशतवाद व अंमली पदार्थ विरोधी पथकांनी अंमली पदार्थांची विक्री करणारे रॅकेटस दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ रोजी

पकडले असून सदर पथकाने पाच तस्करांना अटक करुन १२९ किलो मेफिर्डिन (एमडी) जप्त केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई-पुणे महानगराप्रमाणे रत्नागिरीतही अंमली पदार्थाचा विळखा घालण्यासाठी हरियाणा, राजस्थान मधील टोळी सक्रिय झाली असल्याची माहिती पोलिसांना मिळाली असून रत्नागिरी शहरासह परिसरातील काही निवडक गावांमध्ये मिरजोळे एमआयडीसीत पोलिसांनी छापा टाकून रुपये ४५ लाख किंमतीचे ९३० ग्रॅम कोकेन जप्त केल्याचे दिनांक २१ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दक्षिण आफ्रिकेतून व्हाया दिल्लीमार्गे मुंबईत तस्करीसाठी आणलेले रुपये ६ कोटी १२ लाख किंमतीचे १ किलो २० ग्रॅमचे कोकेन हस्तगत करण्यास वांद्रे पथकाला यश आले असून माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान आफ्रिकन नागरिक जॉन फ्रान्सिस आणि इजिके या दोघांना अटक केली आहे, तसेच मुंबईतील मालाड रेल्वे स्थानक परिसरातून रुपये २० कोटी किंमतीच्या १० किलो हेरॉईन साठ्यासह दोघांना वांद्रे युनिटच्या अॅन्टी नार्कोटिक्स सेलच्या अधिकाऱ्यांनी दिनांक ४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास अटक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चार-पाच वर्षात बांधकाम क्षेत्र, व्यापार, केबल, माथाडी, अंमली पदार्थ, मटका जुगार आणि सट्टा, सोनसाखळी, दरोडा क्षेत्रांतील गुन्हेगारीच्या टोळया वाढत आहे, तसेच मुंबईत महाविद्यालयीन तसेच शाळकरी विद्यार्थ्यांना ड्रग्ज पुरवठा करण्यासाठी व्हॉट्सअप हे माध्यम वापरण्यात येत असून अंमली पदार्थाला महाविद्यालयीन विद्यार्थी, तरुण पिढी मोठ्या प्रमाणात बळी पडत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, तसेच सन २०१९ मध्ये मुंबई पोलिसांनी केलेल्या एकूण कारवाई दरम्यान अंमली पदार्थांच्या तस्करी संदर्भात एकूण ११ हजार ५७२ गुन्हे नोंदविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर कारवाई करुन अंमली पदार्थ विक्री/तस्करी/गुन्हेगारी रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) दहशतवाद विरोधी पथक यांना दिनांक १०/०९/२०१९ रोजी मिळालेल्या गुप्तवार्तेनुसार पूर्व द्रुतगती मार्ग, मुंबईकडे जाणाऱ्या वाहिनीवर, भांडुप पंम्पींग बस स्टॉपच्या पुढे मुंबई येथे विक्रीकरीता नेण्यात येत असलेले ९ किलो मेफिड्रिन (एमडी) सह दोन इसम घेवून येत असल्याची बातमी मिळताच, त्यांना अटक करण्यात आलेली आहे. तसेच अटक इसमांकडे केलेल्या चौकशीत आणखी ३ इसमांना अटक करण्यात आली असून, १२० किलो मेफिड्रिन (एमडी) अंमली पदार्थ हस्तगत करण्यात आला आहे.

(२) पोलीस अधीक्षक, रत्नागिरी यांच्या कार्यक्षेत्रात हरियाणा व राजस्थान मधील ३ इसमांना रत्नागिरी एम.आय.डी.सी. येथील हर्षा फुड्स जवळील पडक्या इमारतीत कोकेन हा अंमली पदार्थ स्वत: जवळ बाळगल्याप्रकरणी रत्नागिरी पो. ठाणे गु.र.नं. ११४/१९ एन.डी.पी.एस. ॲक्ट ८(क), २१(क), २९(क), २९ प्रमाणे ७ इसमांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता.मात्र न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कावळा नाका, कोल्हापूर व न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, चंदिगड या तज्ञ शाखेकडून आरोपींच्या ताब्यात मिळून आलेला मुद्देमाल हा अंमली पदार्थ नसुन युरिया असल्याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्याने, अटक आरोपींची गुन्ह्यांतून मुक्तता करण्यात आली आहे.

(३) अंमली पदार्थ विरोधी कक्ष, बांद्रा युनिट गुन्हा रजिस्टर क्र. ०१/२०१९, कलम ८(क) २१(क), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ अन्वये सेंट ब्लेस चर्च, सिजर रोड जंक्शन, अंबोली, अंधेरी (प), मुंबई ५८, येथे ०१ किलो ०५ ग्रॅम, कोकेन हा अंमली पदार्थ किंमत अंदाजे रुपये ६,०३,००,०००/- किंमतीचा अंमली पदार्थ, आरोपी नामे जॉन जेम्स फ्रान्सिस आणि डॅनीयल इफाई चिक्वू इजिके या दोघांना दिनांक १२/०१/२०१९ रोजी अटक करण्यात आली आहे.

तसेच मुंबईतील मालाड रेल्वे स्थानक परिसरात, अन्य दोन इसमांना अंमली पदार्थ विरोधी कक्ष, बांद्रा युनिट यांनी रुईया चाळ, बी.एम.सी. शौचालयामागे, मालाड (प) मुंबई येथे ६ किलो हेरॉईन, अंदाजे किंमत रुपये १२,००,००,०००/- इतका मुद्देमालासह अटक केली आहे. त्यांच्यावर गु.र.क्र. ०१/२०२०, कलम ८(क) सह २१(क), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(४) सन २०१९ मध्ये अंमली पदार्थ विरोधी कक्ष व मुंबई पोलिसांनी एकूण ११ हजार ७०६ गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत. तसेच अंमली पदार्थ विरोधी कक्ष येथील पोलीस अंमलदार साध्या वेषात गुप्त बातमीदारामार्फत पाळत ठेवत असतात व अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या तस्करांवर तात्काळ कारवाई केली जाते.

(५) विलंब झालेला नाही.

तथापि, अंमली पदार्थाचे सेवन करणारे व विक्री करणाऱ्या इसमाबाबत माहिती प्राप्त होताच त्यांचा शोध घेवून संबंधित इसमाविरुध्द एन.डी.पी.एस. कायदा, १९८५ अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येत असते.

तसेच अंमली पदार्थाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध कार्यक्रम हाती घेण्यात आलेले आहेत. अंमली पदार्थ विरोधी कक्षातर्फे महाविद्यालयीन स्तरावर जानेवारी, २०१५ पासून ड्रग्ज फ्री कॅम्पस हा उपक्रम राबवून जनजागृती करण्याचे प्रयत्न चालू केले आहेत. तसेच सार्वजनिक गणेशोत्सव, नवरात्री, दहिहंडी अशा उत्सवाच्या वेळी अंमली पदार्थ कक्षाच्या वतीने जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येतात. तसेच २६ जून हा अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त २६ जून ते १० जुलै असा पंधरवडा साजरा करण्यात येतो. सदर पंधरवड्यादरम्यान अंमली पदार्थ व त्याचे दुष्परिणाम याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देणे, फिल्म दाखविणे, चर्चासत्र, हॅन्डबील वाटप व भिंती पोस्टर्सचे प्रदर्शन करणे तसेच प्रचार फेऱ्या, मॅरेथॉन, मोहल्ला कमिटी, पब्लिक मिटींग असे कार्यक्रम घेण्यात येतात. तसेच पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे आदेशान्वये दिनांक २८/०७/२०१६ रोजी पासून नार्को इन्फो लाईन मोबाईल क्र.९८१९१११२२२ हा अंमली पदार्थ विरुध्द लोकांमार्फत माहिती मिळवून लोकांच्या मदतीने कारवाई करण्यासाठी सुरु करण्यात आलेला आहे.

----------------

## मौजे वाघोशी (ता.सुधागड, जि.रायगड) येथील जमीन गैरव्यवहाराबाबत

**(२) * ११९८ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वाघोशी (ता.सुधागड, जि.रायगड) येथील गट क्र. ३७, ४८, १७७ या मिळकती जितेंद्र तातेड यांनी खरेदी करताना तहसिलदार, बीड यांचेकडील शेतकरी असल्याचा दाखला पुरावा म्हणून दाखवून बोगसपणे १०० एकर जमीन खरेदी करुन वक्रतुंड सामाजिक उन्नती व वृक्षलागवड सहकारी संस्था मर्यादित तर्फे मुख्य प्रर्वतक अलमित्र बल्लाळ चंद्रचूड यांना विकली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिनांक २४/१०/२०१८ रोजी लेखी पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड व तहसिलदार, आष्टी यांना दाखल्याची पडताळणी करण्याबाबत कळविले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जमीन धारणेची कमाल मर्यादा अधिनियम १९६१ नुसार उपविभागीय अधिकारी, रोहा तसेच मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ नुसार तहसिलदार, सुधागड यांचेकडे याप्रकरणी सुनावणी सुरु होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जमीन गैरव्यवहार प्रकरणी दोषींवर कारवाई करुन उक्त जमीन शासनजमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) मौजे वाघोशी, ता.सुधागड, जि.रायगड येथील गट नं. ३७, गट नं. ४८ व गट नं. १७७ या मिळकती श्री.जितेंद्र ताराचंद्र तातेड व कुटुंबियांनी खरेदी केल्या आहेत. सदर जमीन खरेदी करताना तहसिलदार, आष्टी, जि.बीड यांचेकडील शेतकरी असल्याचा दाखला पुरावा म्हणून सादर केला असल्याने सदर दाखल्याची पडताळणी करणेबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिनांक २४/१०/२०१८ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड यांना कळविले आहे. मौजे वाघोशी, ता.सुधागड, जि.रायगड येथील उक्त मिळकती श्री.जितेंद्र ताराचंद्र तातेड व कुटुंबियांकडून

वक्रतुंड सामाजिक उन्नती व वृक्षलागवड सह. संस्था मर्या. तर्फे मुख्य प्रवर्तक अलमित्र बल्लाळ चंद्रचुड यांनी खरेदी केल्या आहेत. सदर संस्थेने जमीन खरेदी करताना महाराष्ट्र कुळवहिवाट शेतजमीन अधिनियम, १९४८ मधील कलम ६३ नुसार सक्षम प्राधिकारी यांची परवानगी न घेतल्याने अपर तहसिलदार शेतजमीन न्यायाधिकरण, सुधागड यांच्या न्यायालयात महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ८४ क नुसार सुनावणी सुरु आहे. तसेच महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ चा भंग केल्याने महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ नुसार उपविभागीय अधिकारी, रोहा यांचेकडे सुनावणी सुरु आहे. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीअंती नियमानुसार उचित कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) बाजारपेठ पोलीस स्टेशनचे नुतनीकरण करण्याबाबत

**(३) * ७४ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) पश्चिमेतील बाजारपेठ पोलीस स्टेशनचा कारभार शेडवजा इमारतीमधून ९०५ चौ.फुट जागेतून चालवला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुधनाका, आधारवाडी कारागृह, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, दुर्गाडी किल्ला, एम.एम.आर.डी.ए. कार्यालय, एम.ई.एस.बी. कार्यालय अशी महत्वाची व संवेदनशील ठिकाणे या पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात येत असल्याने सदरहू पोलीस स्टेशनची नवीन इमारत व्हावी यासाठी मागील ८ ते ९ वर्षापासून स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे पाठपुरावा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याण येथील अतिशय संवेदनशील भागातील पोलीस स्टेशनची पुनर्बांधणी व नुतनीकरण करण्याबाबत पाठपुरावा करुनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कल्याण बाजारपेठ पोलीस स्टेशनचे नुतनीकरण करून त्याठिकाणी नवीन सुसज्ज व अद्ययावत पोलीस स्टेशन उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) हे खरे नाही. बाजारपेठ पोलीस स्टेशनकरीता नवीन प्रशासकीय इमारत बांधणेबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, म.रा. यांच्यामार्फत महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. यांच्याकडे पाठविण्यात आला असून तो कार्यवाहीधीन आहे. निधी उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा (जि.भंडारा) तालुक्यात अवैध धंदे सुरु असल्याबाबत

**(४) * ७८३ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा (जि.भंडारा) तालुक्यात ऑनलाईन सट्टा लावणे यासारखे अवैध धंदे मागील काही महिन्यांपासून सुरु असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ऑनलाईन सट्टा लावणाऱ्यांमध्ये विद्यार्थी वर्ग मोठ्या प्रमाणावर असून याबाबत स्थानिक नागरिकांनी पोलिसात तक्रार करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सट्टेबाजारांवर कारवाई न करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करून अवैध धंदे रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) भंडारा जिल्ह्यातील पोलीस स्टेशन साकोली अंतर्गत माहे मार्च, २०१९ मध्ये येथे एक गुन्हा व जानेवारी, २०२० मध्ये एक असे दोन अवैध ऑनलाईन सट्टा लावणे संबंधाने भंडारा जिल्ह्याचे अभिलेखावर दोन गुन्ह्याची नोंद आहे.

(२) व (३) नाही. भंडारा (जिल्हा भंडारा) येथे अवैध ऑनलाईन सट्टाबाबत नागरिकांची वा शाळकरी मुलांची एकही तक्रार प्राप्त नाही. शाळेच्या परिसरात अवैध ऑनलाईन सट्टा व अवैध धंदयावर पोलीस सातत्याने लक्ष ठेवून आहेत. त्यामध्ये विद्यार्थी वर्ग लिप्त होणार नाही याबाबत संबंधितांना निर्देश दिले असून त्यावर पोलीस लक्ष ठेवून आहेत. अशा पध्दतीच्या तक्रारी प्राप्त होताच तात्काळ कठोर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात मासेमारी बंदी कालावधीत मच्छिमार कोळी बांधवांना मदत देण्याबाबत

**(५) * ४४९ श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जून, जुलै व ऑगस्ट या पावसाळी हंगामाच्या कालावधीमध्ये मासेमारी करण्यास शासकीय नियमानुसार बंदी असल्याने उक्त तीन महिन्यासाठी मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवांच्या उदरनिर्वाहाकरीता प्रतिमहिना रुपये दहा हजार नुकसान भरपाई (खावटी) देण्याबाबत लोकप्रतिनिधी व मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवांनी शासनाकडे मागणी केल्याचे माहे ऑगस्ट, २०१९ च्या प्रथम सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मासेमारी बंदी असलेल्या कालावधीत मच्छिमार कोळी बांधवांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख :** (१) हे खरे नाही.

१ जून ते ३१ जुलै असा ६१ दिवसांचा मासेमारी बंदी कालावधी आहे. बचत-नि-सवलत या योजनेंतर्गत बंदी कालावधीत लाभार्थी हिस्सा रुपये १५००/-, राज्य शासन हिस्सा रुपये १५००/- तसेच केंद्र शासन हिस्सा रुपये १५००/- असे एकूण रुपये ४५००/- नोंदणीकृत मच्छिमारांना ३ समान हप्त्यात प्रतिवर्ष वितरीत करण्यात येतात.

(२) मागील तीन वर्षामध्ये प्रस्तूत योजनेत खालीलप्रमाणे मच्छिमारांना मदत करण्यात आलेली आहे.

(रुपये लाखात)

| सन | लाभार्थी संख्या | वितरीत अनुदान |
|---|---|---|
| २०१७-१८ | १७६९ | ५३.०७ |
| २०१८-१९ | १३४० | ४०.२० |
| २०१९-२० | ४३२ | १२.९६ |

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील होमगार्डच्या मागण्याबाबत

**(६) * ४९२ ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.रविंद्र फाटक, श्री.रामनिवास सिंह, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, डॉ.रणजित पाटील, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.सदाशिव खोत, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक ४३१८१ ला दिनांक ४ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील होमगार्डना ऑनलाईन संगणक प्रणालीशिवाय कर्तव्यावर घेऊ नये, कोणत्याही होमगार्डला कर्तव्यावर कायम काम मिळेल याचे आश्वासन देऊ नये, सलग कर्तव्य मिळाले तरी त्यांना अन्य कोणत्याही लाभासाठी दावा करता येणार नाही, असे लेखी आदेश दिनांक १३ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास होमगार्ड महाराष्ट्र राज्य कार्यालयाने सर्व जिल्हा समादेशक यांना पाठविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशात बृहन्मुंबई, ठाणे व पालघर या जिल्ह्यांना वगळण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत वाढत्या महागाईनुसार काम करुनही कायमस्वरुपी नियुक्ती मिळत नसल्याने होमगार्डचे भवितव्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील ४२ हजार होमगार्ड गेल्या पाच महिन्यांपासून हक्काच्या मानधनापासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, माहे सप्टेंबरपासूनचे रुपये १३७ कोटी ८३ लाख मानधन थकित असून आर्थिक वर्षअखेर रुपये १४० कोटी ५५ लाखांची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील होमगार्डच्या मागण्यांबाबत पुनर्विचार करुन होमगार्डांचे थकित मानधन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) व (२) होमगार्डना कर्तव्य बंदोबस्त देताना बंदोबस्ताचे समान वाटप व्हावे तसेच कर्तव्य बंदोबस्त देताना कोणत्याही होमगार्डवर अन्याय होवू नये यासाठी ऑनलाईन संगणक प्रणालीव्दारे बंदोबस्त देण्याबाबत दिनांक १३ ऑगस्ट, २०१९ व दिनांक २० ऑगस्ट, २०१९ आदेशान्वये सर्व संबंधितांना कळविले आहे. त्यामध्ये बृहन्मुंबई, ठाणे व पालघर या जिल्ह्यांचा समावेश आहे.

दिनांक २० ऑगस्ट, २०१९ च्या पत्रानुसार होमगार्ड महाराष्ट्र राज्य कार्यालयामार्फत बृहन्मुंबई, ठाणे व पालघर या जिल्ह्यांना लेखी कळविण्यात आलेले आहे.

(३) होमगार्ड ही रोजगार उपलब्ध करुन देणारी संघटना नाही. ती एक मानसेवी सेवा आहे. तसेच मुंबई होमगार्ड अधिनियम, १९४७ मध्ये होमगार्ड सदस्यांना कायमस्वरुपी नियुक्ती देण्याबाबत तरतुद नाही.

(४) व (५) होमगार्डच्या कर्तव्यभत्त्यात वाढ करून रुपये ३००/- वरून रुपये ५७०/- प्रतिदिन करण्यात आला. तसेच होमगार्ड यांना प्रतिवर्षी किमान ५०% रोजगार उपलब्ध असे नियोजन करावे असा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आल्याने होमगार्ड भत्त्यांकरीता तरतुद कमी पडली आहे. याकरीता वाढीव निधी उपलब्ध करून देण्याकरीता रुपये २४२.३९ कोटीची पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे.

-----------------

## जाफ्राबाद (जि.जालना) तालुक्यातील पानशेतीस विमा संरक्षण देण्याबाबत

**(७) * ७९४ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जाफ्राबाद (जि.जालना) तालुक्यातील शेतकरी नागवेलीच्या पानांची शेती करीत असून पानशेतीस नैसर्गिक व इतर आपत्तीत कोणतेही विमा संरक्षण व शासकीय मदत मिळत नसल्याने पानमळाधारक शेतकऱ्यांची संख्या कमी होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय आहे, चौकशीच्या अनुषंगाने पानमळाधारक शेतकऱ्यांना नैसर्गिक व इतर आपत्तीत विमा संरक्षण व शासकीय मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेंतर्गत पानवेली या पिकाचा समावेश नाही. तथापि, मौजे भारज, ता.जाफ्राबाद, जि.जालना येथील पानवेलीची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना आत्मा योजनेतून पानवेली संशोधन

केंद्र, रामटेक येथे प्रशिक्षणासाठी पाठविण्याचे नियोजित आहे. तसेच एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत काही शेतकऱ्यांना शेडनेट हाऊस, मागेल त्याला शेततळे व शेततळे अस्तरीकरण या बाबींचा लाभ देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील गुडविन ज्वेलर्सचे व्यवस्थापकीय संचालकांनी गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याबाबत

**(८) * २८ श्री.प्रसाद लाड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रविण दरेकर, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील गुडविन ज्वेलर्सचे व्यवस्थापकीय संचालकासह ५ जणांनी गुंतवणूकदारांना गुंतवणूकीवर जादा व्याज दराचे तसेच सोन्याचे दागिने देण्याचे प्रलोभन दाखवून ठाणे शहर आणि मुंबई परिसरातील १८० हून अधिक गुंतवणूकदारांची सुमारे साडेचार कोटींची फसवणूक करुन फरार झाल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नौपाडा (ठाणे) पोलीस ठाण्यात गुडविन ज्वेलर्सच्याविरुध्द माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये पहिला गुन्हा दाखल झाल्यानंतर माहे ऑक्टोबर, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात एकूण ९२ गुंतवणूकदारांनी व आतापर्यंत १६५ गुंतवणूकदारांनी विविध पोलीस स्टेशनवर गुन्हे दाखल केले असून रुपये ३ कोटी ८ लाखांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित गुन्हेगारावर कारवाई करुन फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांचे पैसे परत मिळण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सदर गुन्ह्यातील फसवणूक झालेले गुंतवणूकदार ६८८३ असून फसवणूकीची एकूण रक्कम रुपये १,६०,६९,७७,२६८/- इतकी आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी राज्यात विविध पोलीस ठाण्यांमध्ये १२ गुन्हे दाखल असून सदर गुन्ह्यात एकूण २ मुख्य आरोपींना अटक करण्यात आली आहे.

केरळ, तामिळनाडू व महाराष्ट्र येथील आरोपींच्या ३८ स्थावर मालमत्ता व ७ जंगम मालमत्ता संरक्षित करण्यात आली असून ७ बँक खाती गोठविण्यात आली आहेत. संरक्षित केलेल्या या मालमत्तेची अंदाजित रक्कम किंमत रुपये ९२,९९,५४,२२४/- इतकी आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माहिम (मुंबई) येथील इंजिनिअरिंग कॉलेजमधील मुलीवर ॲसिड हल्ला झाल्याबाबत

**(९) * ३१२ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहिम (मुंबई) येथील इंजिनिअरिंग कॉलेजमधील १६ वर्षीय मुलीवर माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान ॲसिड हल्ला झाल्याची घटना घडली असून सदर प्रकरणी विक्रोळी पार्कसाईट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ॲसिड हल्ला करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी पार्कसाईट पोलीस ठाणे येथे भा.दं.वि.सं. कलम ३२६(ब), ३५४, ५०६(२), ३४ सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ८, १२ अन्वये गु.र.क्र. ६७२/२०१९ गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सखोल चौकशी सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## काटोल (जि.नागपूर) तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत देण्याबाबत

**(१०) * ३३३ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काटोल (जि.नागपूर) तालुक्यात माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये झालेल्या पावसाने संत्रा व मोसंबी या फळ पिकांचे, कपासी, सोयाबीन व भाजीपिकांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विमा कंपन्यांनी नुकसान भरपाई दिली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पीक विम्याची रक्कम थकविणाऱ्या विमा कंपन्यावर कारवाई करुन शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) याबाबत केंद्र व राज्यस्तरावर नुकसान भरपाई निश्चित करणेबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात आला आहे. त्यानुसार संबंधित विमा कंपन्यांना केंद्र शासनाने दिनांक ११/०२/२०२० च्या पत्रान्वये अवेळी/चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसान भरपाईची अदायगी करणेबाबत निर्देश दिले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मिठागरांच्या जमिनी विकसित करण्याबाबत

**(११) * ७३० श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्रीमती स्मिता वाघ, श्री.रामदास कदम, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.रमेशदादा पाटील, श्री.महादेव जानकर, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मिठागरांच्या ६०० पैकी ३०० एकर जमिनींवर विकासकामे शक्य असल्याचा अहवाल एम.एम.आर.डी.ए.ने शासनाला दिला असून सदर अहवालानुसार मिठागरांच्या जमिनी विकास कामाकरीता खुल्या होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिठागरांच्या या जमिनींवर केंद्र शासन मालकीचा दावा करीत असताना तेथे राज्य शासन विकास कामे करु शकते काय तसेच त्यामुळे मुंबईत पाणी तुंबण्याचा निर्माण होणाऱ्या धोक्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे या केंद्र शासनाच्या योजनेला गती देण्यात येऊन वाजवी दरातील घरे या जागेवर बांधण्यात येणार काय तसेच या मिठागरावर मिठशेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे संपूर्ण पुनर्वसन करुन त्यांनाही या योजनेचा लाभ शासन देणार आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील मिठागर जमिनींचा समुचित वापर करण्याद्दष्टीने बृहत आराखडा तयार करण्याकरीता शासन निर्णय, दिनांक २१/०८/२०१५ अन्वये शासनाने "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास" नियुक्त केले आहे. सदर प्रक्रियेवर पर्यवेक्षण व सनियंत्रण ठेवण्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली "उच्चधिकार समिती" गठीत करण्यात आली आहे.

पर्यावरण विभागाकडील अद्ययावत नकाशे, पाणथळ जागेची व्याख्या आणि पर्यावरण विभागाकडून प्राप्त झालेल्या सन २०११ च्या CRZ अधिसूचनेनुसार CZMP यांची माहिती संकलित केली असता, मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील ७ मिठागरांच्या क्षेत्रात झोपडपट्टीचे क्षेत्र धरुन एकत्रितपणे सुमारे ३५५.३३ एकर इतके विकसनशील क्षेत्र उपलब्ध होत असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते. उक्त विकासनशील क्षेत्रात CRZ-I क्षेत्राचा समावेश नाही. या मिठागर जमिनी केंद्र व राज्य शासन यांच्या मालकीच्या असल्याने, सदर जमिनींच्या विकासासंदर्भात दोन्ही शासनाच्या समन्वयाने धोरण ठरवावयाचे आहे. त्यासाठी जागेवर प्रत्यक्ष मोजणी करुन व बृहन्मुंबई महानगरपालिकेचा विकास आराखडा-२०३४ प्रमाणे विकसनशील आरक्षणे यांचा विचार करुन, विकासाचे धोरण ठरविणे अभिप्रेत आहे. त्याशिवाय, उक्त विकसनशील क्षेत्राच्या निश्चित वापराविषयी निर्णय घेता येणार नाही. त्यामुळे सदर जमिनीवर वाजवी दरातील घरबांधणी प्रकल्प राबविण्यासंबंधी राज्य शासनाने अद्याप कोणताही अंतिम निर्णय घेतलेला नाही.

वरीलप्रमाणे विकासासाठी उपलब्ध होणारी जमीन ही मीठ उत्पादनाखाली येत नाही, याची तपासणी मिठागर आयुक्त यांच्याकडून करुन घेण्याचे संकल्पित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा महामार्गाकरीता भूसंपादित झालेल्या बाधितांना मोबदला देण्याबाबत

**(१२) * ८३६ श्री.रविंद्र फाटक, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरणाचे सुरु असलेल्या कामामुळे महाड, पोलादपूर तालुक्यातील जवळपास आठ हजार शेतकऱ्यांच्या जमिनी बाधित झाल्या असून जमिनी, झाडे व इतर मालमत्ता संपादित करण्यात आलेल्या बाधितांना भूसंपादनाचा मोबदला मिळाला नसल्याने शेतकरी, जमीन मालक यांना संबंधित प्रांताधिकारी, प्रकल्प अधिकारी कार्यालयात मोबदल्याच्या रक्कमेकरीता वारंवार फेऱ्या मारावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाधितांना मोबदला मिळण्यास शासनाकडून नेमलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्यांकडून दिरंगाई होत असल्यामुळे शेतकऱ्यांना बाधित जमिनीचा मोबदला न दिल्यास महामार्गाचे सुरु असलेले काम बंद पाडण्याचा इशारा देण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मुंबई-गोवा महामार्ग प्रकल्प बाधितांना मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) होय, हे खरे आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ चे रूंदीकरणासाठी महाड तालुक्यातील १२ गावांच्या व पोलादपूर तालुक्यातील ९ गावांच्या असा एकूण २१ गावांच्या ९२३० खातेदारांच्या जमिनी संपादन होत आहेत. त्यापैकी ७३८४ खातेदारांना/सहहिस्सेदार यांना जमिनीचा मोबदला रक्कम रूपये ५५०.२५ कोटी वाटप करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

निवाड्याप्रमाणे अतिरिक्त निधी एकूण रक्कम रुपये ८५.११ कोटी मागणी केलेली होती. त्यापैकी रक्कम रुपये ४७.७२ कोटी निधी दिनांक २७/०१/२०२० रोजी उपविभागीय अधिकारी, महाड यांचेकडे जमा झालेला आहे. त्याचे वाटप संबंधितांना करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुसद (जि.यवतमाळ) तालुक्यातील गुन्हेगारीचे प्रमाण रोखण्याबाबत

**(१३) * १०३ डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद (जि.यवतमाळ) तालुक्यातील वसंत नगर व इतर परिसरामध्ये चोरी, दरोडेखोरी, गोळीबार, मारामारी अशा प्रकारच्या गुन्ह्यात वाढ झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गुन्हेगारीचे प्रमाण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) मागील ३ वर्षात यवतमाळ जिल्ह्यातील पुसद येथील वसंतनगर व पुसद शहर या दोन पोलीस स्टेशनमध्ये नोंद असलेल्या गुन्ह्यांची माहिती :-

| अ.क्र. | प्रकार | २०१७ | २०१८ | २०१९ | फरक (सन २०१८ व २०१९ मधील) |
|---|---|---|---|---|---|
| १ | चोरी | ११६ | ६५ | ७८ | +१३ |
| २ | दरोडखोरी | ० | ० | ० | ० |
| ३ | गोळीबार | ० | ० | १ | +१ |
| ४ | मारामारी | ० | १ | १ | सम |
| ५ | दुखापत | ९७ | ६० | ७६ | +१६ |

वरीलप्रमाणे नोंद असलेल्या सर्व गुन्ह्यांचा तपास करुन आरोपीविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. उर्वरित गुन्हे तपासावर आहेत.

(२) पुसद येथे गुन्हेगारीचे प्रमाण रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आली आहे.

१. सन २०१८ मध्ये ७८३ व सन २०१९ मध्ये ७०५ ईसमाविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.
२. रात्रगस्तमध्ये वाढ करुन गस्त प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.
३. अचानक नाकाबंदी करणे.
४. ऑल आऊट स्कीम वेळोवेळी राबवणे.
५. शहरात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले आहेत.
६. व्यापारी, हौसिंग सोसायटी व बँक व्यवस्थापनाच्या बैठका घेऊन मार्गदर्शन करण्यात येते आणि लोकांना सुरक्षारक्षक, गुरखा व चौकीदार नेमण्याबाबत प्रवत्त करणे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रिलायन्स जियो इन्फो कॉम. लि. या कंपनीकडून दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत

**(१४) * ७०२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.सुजितसिंह ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक ४६८७१ ला दिनांक २ जुलै, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिलायन्स जियो इन्फो कॉम. लि. या कंपनीने केलेल्या अवैध गौण खनिज उत्खननापोटी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी रुपये २६ कोटींचा दंड रिलायन्स जियो कंपनीकडून वसूल करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, परभणी यांना माहे जून, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, परभणी यांनी जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदीप्रमाणे वसुलीची कारवाई न करता केवळ नोटीस जारी करुन दंड वसुलीबाबत कोणतीही कार्यवाही करीत नसल्याबाबतची लेखी तक्रार परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी मुख्य सचिव यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रिलायन्स जियो कंपनीकडून दंड वसूल करण्याच्या कामात विलंब लावणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करुन दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) रिलायन्स जियो इन्फो कॉम. लि. या कंपनीने केलेल्या अवैध गौण खनिज उत्खननापोटी रुपये २५,९५,६४,७५०/- इतक्या दंडात्मक रक्कमेचे जिल्हाधिकारी, परभणी यांचे दिनांक ७/८/२०१८ रोजीचे आदेश व तहसिलदार, परभणी यांनी दिनांक २२/१०/२०१८ रोजीची थकबाकी वसुलीची नोटीस कायम ठेवण्याबाबत अपर आयुक्त, औरंगाबाद यांनी दिनांक १०/६/२०१९ रोजी आदेश पारीत केले आहेत.
(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(३) रिलायन्स जियो या कंपनीच्या चल व अचल मालमत्तेची माहिती घेऊन दंडात्मक रकमेची वसूली करण्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना कळविले होते. त्यानुसार तहसिलदार, शासकीय देय वसूली शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांनी दिनांक ३१/१/२०२० रोजी सदर कंपनीस महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम २६७ नुसार दंडात्मक रक्कम मागणीची नोटीस काढली आहे. तसेच सदर कंपनीने अपर आयुक्त, औरंगाबाद यांच्या दिनांक १०/६/२०१९ रोजीच्या आदेशाविरुध्द अपर आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे पुनर्रिक्षण अर्ज दाखल केला असून सदर अपिल अर्ज सुनावणीकामी प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हाधिकारी कार्यालयात वाळू साठ्याचा बेकायदेशीर लिलाव केल्याबाबत

**(१५) * ७५७ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हाधिकारी कार्यालयात जप्त केलेल्या वाळू साठ्याचा लिलाव नियमांचे पालन न करता केल्याने तहसिलदार, बीड यांना निलंबित करुन त्यांच्याकडून नुकसानीचे पैसे वसुल करावे, अशी मागणी तेथील भ्रष्टाचार समितीच्या संघटनेनी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे याबाबत प्रस्ताव प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) दिनांक २५/११/२०१९ रोजी स्थानिक वृत्तपत्रात जाहीर प्रगटन देवून दिनांक ३०/११/२०१९ रोजी जप्त वाळूसाठ्याचा लिलाव ठेवण्यात आला होता. तथापि, सदर लिलावात बोलीसाठी कोणी हजर न झाल्याने पुन्हा दिनांक २/१२/२०१९ रोजी तहसिल कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर जाहीर प्रगटन करुन दिनांक ७/१२/२०१९ रोजी वाळूसाठ्याचा लिलाव ठेवला होता. सदर लिलावात ठरविण्यात आलेल्या रुपये २४९३/- प्रतिब्रास हातच्या किंमतीपेक्षा रुपये २७५०/- प्रतिब्रास इतक्या दराने सर्वोच्च बोली प्राप्त झाली. त्यानुसार जप्त वाळूसाठ्याच्या लिलावातून रुपये ५,०८,२००/- इतकी रक्कम प्राप्त झाली असून सदर रक्कम शासनजमा करण्यात आली आहे. सदर लिलाव प्रक्रियेत कोणतीही अनियमितता व आर्थिक नुकसान झाल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील मत्स्यव्यवसाय विकास अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत

**(१६) * ९५९ श्री.रामदास कदम :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात पर्ससीन मासेमारी ट्रॉलरवर कारवाई न करण्याच्या अटीवर मत्स्यव्यवसाय विकास अधिकाऱ्याने एका व्यावसायिकाकडून रुपये ५ लाख लाचेची मागणी केली असल्याने उक्त व्यावसायिकाने लाचलुचपत विभागाकडे तक्रार केली असून सदर मत्स्यव्यवसाय अधिकाऱ्याला लाच घेताना लाचलुचपत विभागाने रंगेहात पकडून अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्ससीन व एलईडी नौकांमार्फत होणाऱ्या मासेमारीमुळे स्थानिक मच्छिमारांचे व्यवसाय धोक्यात येऊन रोजगारावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पर्ससीन व एलईडीव्दारे करण्यात येणाऱ्या मासेमारीवर बंदी घालण्याकरीता नवीन कायदा तयार करण्याची मागणी मच्छिमारांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लाच घेणाऱ्या मत्स्यविकास अधिकाऱ्यावर तसेच बेकायदेशीर मासेमारी करणाऱ्या ट्रॉलरवर कारवाई करुन पर्ससीन व एलईडी मासेमारीवर बंदी घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे आहे. तसेच कायदा बनविण्याचे कार्य सध्या सुरु आहे.

(४) लाच घेताना लाचलुचपत विभागाने अटक केलेल्या मत्स्यव्यवसाय विकास अधिकाऱ्याला दिनांक १३/०१/२०२० च्या शासन आदेशान्वये निलंबित करण्यात आलेले आहे.

शासन अधिसूचना दिनांक २७/०४/२०१८ अन्वये एलईडी मासेमारी प्रतिबंध करण्यात आलेली आहे. तसेच शासन आदेश दिनांक ५/०२/२०१६ अन्वये पर्ससीन मासेमारीचे नियमन करण्यात आलेले असून शास्वत मासेमारी टिकून राहण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हयातील विहिरींची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(१७) * ४४० श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात सार्वजनिक पाणी पुरवठ्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायती अंतर्गत देण्यात आलेल्या मंजूर विहिरींपैकी २९८ विहिरींची कामे सुरु झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजूर विहिरींपैकी २९८ विहिरींची कामे सुरु न होण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार विहिरींची कामे सुरु करण्याबाबत कार्यवाही करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) २३२ विहिरींची कामे मजूरांची मागणी नसल्यामुळे व इतर कारणामुळे सुरु झालेली नाहीत. मजुर उपलब्धतेनुसार विहिरींची कामे सुरु करण्यात येतील.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रेडीओ क्लब, कुलाबा (मुंबई) परिसरातील मुलीचा नरबळी दिल्याबाबत

**(१८) * ५८६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुलाबा (मुंबई) रेडीओ क्लब परिसरातील अशोका टॉवरमधील एका तीन वर्षाच्या मुलीचा संपत्तीसाठी नरबळी देण्यात आल्याची घटना दिनांक ८/०९/२०१९ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या घटनेतील गुन्हेगारांवर कारवाई करण्याबाबत तसेच राज्यात वारंवार नरबळीच्या वाढत असलेल्या घटना रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय. तथापि, सदर घटना ही संपत्तीसाठी नरबळीची नसून अंधश्रध्दा/जादुटोण्याशी संबंधित नरबळीची आहे.

(२) सदर गुन्ह्यात कुलाबा पोलीस ठाणे, मुंबई येथे महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत अधिनियम, २०१३ अन्वये गुन्हा दाखल करुन आरोपीस अटक करण्यात आली असून आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

असे प्रकार टाळण्यासाठी महिला दक्षता कमिटी, मोहल्ला कमिटी व ज्येष्ठ नागरिकांच्या सभांव्दारे भोंदूबाबा, बुवाबाजी, अंधश्रध्दा याबाबत सावधगिरी बाळगून न फसण्याचे आवाहन करण्यात येते. बुवाबाजी करुन कोणी फसवणूक करत असल्याचे आढळल्यास प्रचलित कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात येतात. अशा गुन्ह्यांमध्ये पकडण्यात आलेल्या गुन्हेगारांविरुध्द तपास करुन न्यायालयात आरोपपत्र दाखल करुन कठोर शिक्षा होण्यासाठी प्रयत्न केले जातात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमळनेर (जि.जळगाव) पोलीस स्टेशनचे विभाजन करण्याबाबत

**(१९) * ९०० श्रीमती स्मिता वाघ : तारांकित प्रश्न क्रमांक ४८२१८ ला दिनांक २६ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर (जि.जळगाव) येथील पोलीस स्टेशनचे विभाजन करून तालुका व शहर पोलीस स्टेशनची निर्मिती होणेबाबत प्रस्ताव प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावाचा समावेश दुसऱ्या टप्प्यात करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पोलीस स्टेशनचे विभाजन कधीपर्यंत करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अमळनेर पोलीस स्टेशनचे विभाजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१), (२), (३) व (४) अमळनेर (जि.जळगाव) येथील पोलीस स्टेशनचे विभाजन करून नवीन अमळनेर शहर पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव पोलीस दलाच्या पदनिर्मितीच्या दुसऱ्या टप्प्यात समाविष्ट आहे.

वित्त विभागाच्या सूचनेनुसार महाराष्ट्र राज्य पोलीस दलाचा सुधारीत मापदंडानुसार आकृतिबंध निश्चित होईपर्यंत नवीन पदनिर्मितीवर निर्बंध आहेत. सबब आकृतिबंध निश्चितीचा एकत्रित प्रस्ताव सादर करणेबाबत पोलीस महासंचालक कार्यालयास कळविण्यात आले होते. त्यानुसार पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत याबाबतचा प्रस्ताव दिनांक १८/०२/२०२० रोजी सादर करण्यात आला असून वित्त विभागाच्या मान्यतेने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कारागृहे व सुधारगृहे वाढविण्याबाबत

**(२०) * १२३ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.आनंद ठाकूर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चार मध्यवर्ती कारागृहे, तीन जिल्हा कारागृहे आणि सुधारगृहात कैद्यांना झोपण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध नसल्याचे नियंत्रक व महालेखापाल (कॅग) यांच्या माहे मार्च, २०१८ च्या अहवालातून दिनांक २५ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र कारागृह (कारागृह इमारत आणि स्वच्छता व्यवस्था) नियमावली, १९६४ मधील तरतुदीनुसार कैद्यांना तुरुंगात दाटीवाटीने झोपावे लागत असल्यामुळे २१९३ कैद्यांच्या त्वचारोगात वाढ होऊन कैद्यांच्या मानवाधिकाराचे उल्लघंन होऊन अनेक कैदी आजारांनी ग्रस्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी उपाययोजना करण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने माहे मार्च, २०१८ मध्ये निर्देश दिले असून याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निरीक्षणही कॅगच्या अहवालात नोंदविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कैद्यांच्या वाढत्या संख्येच्यादृष्टीने कारागृह वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

राज्यातील कारागृहामध्ये त्वचारोगासह इतर संसर्गजन्य आजाराच्या बंद्यांना स्वतंत्र बॅरेक्समध्ये ठेवण्यात येते, आठवड्यातून एक वेळ त्वचारोग तज्ञ वैद्यकिय अधिकारी कारागृहास भेट देतात, याशिवाय वैद्यकिय शिबिरांचे आयोजन करुन बंद्यांची नियमितपणे तपासणी करुन आवश्यक तो उपचार केला जातो.

(३) व (४) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील सुमोटो पीआयएल ०३/१७ व दिनांक १ मार्च, २०१८ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार नवी मुंबई, तुर्भे (मौ.मंडाले), अहमदनगर येथे नविन कारागृह बांधणेबाबत जागा उपलब्ध झाली असून उपवास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नकाशे व आराखडे प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे. गोंदिया जिल्हा कारागृह बाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

मध्यवर्ती व जिल्हा कारागृहामध्ये बंद्यांना झोपण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध करुन देणेसाठी अतिरिक्त बॅरेक्सचे बांधकाम करण्याची उपाययोजना सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चुनाळा (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथील कृषी विभागांतर्गत चिकित्सालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२१) * २७० श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चुनाळा (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथे कृषी विभागांतर्गत चिकित्सालय शेतकरी प्रशिक्षण कार्यालय सुरु करण्यात आले असून सदर केंद्रासाठी अकरा पदांची मंजूरी असताना आठ पदे रिक्त असल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

तालुका फळरोपवाटिका, चुनाळा, ता.राजुरा, जि.चंद्रपूर येथे एकूण ११ पदे मंजूर असून त्यापैकी ४ पदे भरलेली तर ७ पदे रिक्त आहेत.

(२) प्रस्तुत कार्यालयात कृषी पर्यवेक्षक १, रोपमळा मदतनीस ३, मजुर १, ट्रिलर ऑपरेटर १ आणि शिपाई १ अशी एकूण ७ पदे रिक्त आहेत. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी महाराष्ट्र कृषी सेवा वर्ग-१ ते वर्ग-३ संवर्गातील १०० टक्के रिक्त पदे भरण्यासाठी विशेष बाब म्हणून मान्यता दिलेली आहे. त्यानुसार तांत्रिक संवर्गातील पदभरती जवळपास पूर्ण झालेली आहे.

कृषी पर्यवेक्षकांची पदोन्नतीच्या कोट्यातील तसेच मर्यादित विभागीय परीक्षा कोट्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक २५/०५/२०१७ अन्वये सूचित केल्यानुसार प्रशासकीय विभागांकडून अंतिम आकृतिबंध मंजूर करुन घेण्यात आल्याशिवाय, संबंधित विभागांना नवीन पदनिर्मिती तसेच पदभरती करता येणार नाही. विभागातील पदांचा आढावा घेवून कृषी विभागाचा सुधारित आकृतिबंध अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे. आकृतिबंध अंतिम झाल्यानंतर गट-क संवर्गाच्या (तांत्रिक पदे वगळून) पद निश्चितीनंतर त्या संवर्गाची पदे नियुक्ती प्राधिकाऱ्यांचेस्तरावर प्रचलित नियमानुसार भरण्याची कार्यवाही अनुसरण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील दूध उत्पादकांना दरवाढ देण्याबाबत

**(२२) * १३५८ श्री.विलास पोतनीस, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दूध व्यवसायिक शेतकऱ्यांना दूध विक्रीत रुपये दोन दरवाढ करण्याचा निर्णय पुणे येथे पार पडलेल्या खाजगी संघाच्या बैठकीत दिनांक १२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात दूध दरवाढीची मागणी सहकारी संघानेही केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून दुधाला अनुदान देण्याबाबत करण्यात आलेल्या घोषणेची प्रत्यक्षात अंमलबजावणी होत नसल्याने अनुदानाची योजना बंद करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील दूध उत्पादकांना दुधाला दरवाढ देण्याबाबत तसेच, प्रतिलिटर दुधाला अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार :** (१) राज्यातील सहकारी तसेच खाजगी दूध संघांकडून गाय व म्हैस दूध खरेदी व विक्रीच्या दरामध्ये दोन रुपयांची वाढ करण्यात आली असल्याचे वृत्त दिनांक ११ जानेवारी, २०२० रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याचे आढळून आले आहे.
(२) सहकार व खाजगी क्षेत्र त्यांच्या दूध खरेदी विक्रीचे दर त्यांच्यास्तरावर निश्चित करीत असतात. शासनास दूध पुरवठा करणाऱ्या ३ सहकारी दूध संघांनी दूध खरेदी दरात वाढ करुन मिळावी अशी विनंती आयुक्त, दुग्धव्यवसाय कार्यालयास केली आहे.
(३) व (४) हे खरे नाही, शासनाने दिनांक २०/०७/२०१८ व दिनांक ३१/०७/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये राबविलेली प्रतिलिटर दूध अनुदान योजना दिनांक १/०८/२०१८ ते दिनांक ३०/०४/२०१९ या कालावधीसाठी होती.

या योजनेंतर्गत शासनाने आतापर्यंत रुपये ५८८.८३ कोटी इतकी रक्कम वितरीत केली असून, उर्वरित रुपये १२८ कोटी सदर अनुदानापोटी वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. आयुक्त, दुग्धव्यवसाय यांनी शासकीय दूध योजनेकरीता दूध खरेदी दर निश्चित करण्याबाबतचा सादर केलेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) येथील खार जमिनीवरील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत

**(२३) * १४२४ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथील भुईगाव खुर्द-बुद्रुक हद्दीतील सर्व्हे नंबर १५४, १५५, १६३, १६४ व २२० येथील शासनाच्या मालकीच्या पाणथळ खार जमिनीवरील कांदळवनाची (तिवराच्या झाडांची) बेसुमार कत्तल करून त्या जागी बेकायदेशीर अतिक्रमण करून मातीचा भराव टाकून अनधिकृत बांधकामे व चाळी तसेच कोळंबी प्रकल्प उभारल्याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २५ जुलै, २०१६ रोजी अनधिकृत बांधकामे व चाळी तसेच कोळंबी प्रकल्प निष्कासित करून पाणथळ जागेचे संवर्धन करण्याचे न्यायालयाचे आदेश असतानाही सदरच्या अतिक्रमणावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत वसई मधील शासकीय जागेवरील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत पर्यावरण संवर्धन समिती वसई-विरार यांनी दिनांक २ मे, २०१९ रोजी व दिनांक १३ जून, २०१९ रोजी विभागीय आयुक्त (कोकण विभाग), जिल्हाधिकारी, पालघर तसेच तहसिल उपविभागीय अधिकारी, ता.वसई, जि.पालघर यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वसई (जि.पालघर) येथील खार जमिनीवरील बेकायदेशीर अतिक्रमणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) मौजे भुईगाव खुर्द, ता.वसई, जि.पालघर येथील स.नं. १५४ व स.नं. १५५ हे क्षेत्र खाजगी मालकीचे नावे आहेत. मात्र मौजे भुईगाव खुर्द, ता.वसई, जि.पालघर येथील स.नं. १६३ व स.नं. १६४ तसेच भुईगाव बुद्रुक येथील स.नं. २२०अ या सरकारी खांजण जमिनीवर अनधिकृत बांधकाम तसेच तलाव उभारले गेले असल्याचे निदर्शनास आले होते. याबाबत जनहित याचिका क्र.८७/२०१३ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २५/०७/२०१६ रोजी दिलेल्या निदेशानुसार तहसिलदार, वसई यांनी निष्कासनाची कारवाई केली असून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२) व (३) सरकारी आणि पाणथळ जागेवरील अनधिकृत अतिक्रमणे (कोळंबी प्रकल्प) हटविणेबाबत समन्वयक, पर्यावरण संवर्धन समिती, वसई-विरार यांनी उपविभागीय अधिकारी, वसई, जि.पालघर यांना दिनांक ०२/०५/२०१९ रोजी तसेच अनधिकृत बांधकामे निष्कासित करणेबाबत जिल्हाधिकारी, पालघर यांना दिनांक १३/०६/२०१९ रोजी निवेदन दिले आहे. त्यानुषंगाने अनधिकृत तलावांवर दिनांक १०/१२/२०१९ रोजी निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण कार्यान्वित करण्याबाबत

**(२४) * १४४९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्थापन करण्यात आलेले सत्र न्यायालयाचे अधिकार प्राप्त राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण शासनाच्या दुर्लक्षामुळे बंद होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्राधिकरणाकडे गेल्या तीन वर्षात राज्यभरातून प्राप्त झालेल्या पोलीस शिपायापासून आयपीएस अधिकाऱ्यांविरोधातील १४०० तक्रारींवर सुनावणी करून निकाल दिले असून सदर प्राधिकरण बंद होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, प्राधिकरणाने राज्याच्या सहा महसुली विभागांमध्ये उपकेंद्र स्थापन करण्याचा निर्धार केला असताना तीन वर्षांमध्ये फक्त दोन उपकेंद्रांची स्थापना केली आहे तसेच रिक्त पदे न भरल्याने व कंत्राट न वाढविल्याने प्राधिकरणाचे न्यायपीठ तांत्रिकदृष्ट्या अवैध होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) हे खरे नाही.

(२) राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाकडे गेल्या तीन वर्षात १४८७ तक्रारीपैकी १३७४ तक्रारी निकाली काढल्या आहेत. अध्यक्षांनी मुदतीपुर्वी राजीनामा दिनांक ८ ऑक्टोबर, २०१९ रोजी दिला असून इतर सदस्यांचा तीन वर्षाचा कालावधी दिनांक २ जानेवारी, २०२० पासून संपुष्टात आला असल्याने, अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्तीची प्रक्रिया शासनस्तरावर सुरु करण्यात आली आहे. त्यानुसार सदर पदावर रितसर नियुक्त्या होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात अतिरिक्त पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) यांच्याकडे अध्यक्ष व सदस्य (पो) या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात येऊन प्राधिकरण सुरु आहे.

(३) व (४) महाराष्ट्र पोलीस (सुधारणा व पुढे चालु ठेवणे) अध्यादेश, २०१४ मध्ये विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरणाची स्थापना करण्याची तरतुद असून पुणे व नाशिक येथील प्राधिकरण सुरु झाले आहे. कोकण विभाग व उर्वरित तीन विभागीय प्राधिकरणावर नियुक्त केलेल्या सेवानिवृत्त जिल्हा प्रधान न्यायाधीश यांनी कार्यभार स्वीकारला नसल्याने अध्यक्ष व सदस्य या पदावर नव्याने पुन्हा नियुक्तीची कार्यवाही शासनाच्या विचाराधीन असून पोलीस

उपआयुक्त (मुख्यालय) हे सदस्य व पोलीस उपअधीक्षक दर्जाचे सदस्य सचिव तसेच, आवश्यक इतर कर्मचारी कार्यरत असून कार्यालय सुरु आहेत.

अध्यक्ष व सदस्य यांचा कार्यकाल समाप्त झाल्यानंतर कंत्राट / मुदतवाढ देण्याची उपरोक्त अधिनियमात तरतुद नाही.

राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाच्या समितीच्या सदस्यांच्या निवडीची प्रक्रिया शासनस्तरावर सुरु असून रितसर नियुक्त्यांची कार्यवाही होईपर्यंत राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाचे अध्यक्ष व सदस्य (पो.) या पदाचा अतिरिक्त कार्यभार, अतिरिक्त पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) यांच्याकडे दिनांक ३०/०१/२०२० अन्वये सोपविण्यात आलेला आहे. तसेच, मा.उच्च न्यायालयाकडून प्राप्त झालेल्या शिफारशींच्या अनुषंगाने अध्यक्ष या पदावर सेवानिवृत्त उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांची दिनांक २६/०२/२०२० अन्वये नियुक्ती करण्यात आली आहे.

(५) शासनाव्दारे वेळोवेळी कार्यवाही करण्यात आली असून, आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे. विलंब झालेला नाही.

-----------------

## राज्यातील महिलांवरील अत्याचार रोखण्याबाबत

**(२५) * १४९८ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.अरुणकाका जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.प्रकाश गजभिये, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.जनार्दन चांदूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.अंबादास दानवे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विलास पोतनीस, श्री.रविंद्र फाटक, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दररोज तीस मुलांचे अपहरण होत असून त्यापैकी ७२ टक्के मुली असल्याचे राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या (एनसीआरबी) अहवालावरुन निदर्शनास आले असून राज्यात महिलांवरील अत्याचाराच्या घटना दिवसेंदिवस वाढत असून महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी, राज्यातील महिला व मुलींना निर्भयपणे वावरता यावे व गुन्हेगारांवर वचक बसावा यासाठी आंध्रप्रदेश राज्याच्या धर्तीवर “दिशा” यासारखा कायदा करण्यात यावा अशी मागणी राज्यातील सर्व जनतेकडून करण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंध्रप्रदेश राज्याच्या धर्तीवर “दिशा” कायदा राज्यातही करण्याबाबतचे राज्य शासनाच्या विचाराधीन असल्याचे मा.गृह मंत्री यांनी दिनांक १८ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास घोषित केले आहे, उक्त प्रकरणी शासनाचा निर्णय झाला आहे काय व त्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, राज्यात २२ हजार ७७५ अत्याचाराच्या दाव्याची सूनावणी प्रलंबित असून राज्यात महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण कमी होण्याऐवजी वाढतच असल्याने गून्हयांचे खटलेही वर्षानूवर्षे प्रलंबित असल्याने महिलांवरील वाढते अत्याचार कमी व्हावे याकरीता जलदगती न्यायालये (फास्ट ट्रॅक कोर्ट) स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील मुलांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने संरक्षण यंत्रणा तयार करण्याबाबत तसेच महिलांवरील अत्याचाराच्या घटना रोखण्याच्यादृष्टीने गुन्हेगारांवर वचक बसावा यासाठी आंध्रप्रदेश राज्याच्या धर्तीवर “दिशा” यासारखा कायदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय.

(२) महिलांवरील अत्याचाराच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी आंध्रप्रदेश राज्याप्रमाणे महाराष्ट्रातही नविन कायदा तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) राज्यात महिला व बालक अंतर्भूत असलेली प्रकरणे चालवून त्वरीत निकाली काढण्यासाठी जलदगती न्यायालये स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) महिलांवरील अत्याचाराच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी आंध्रप्रदेश राज्याप्रमाणे महाराष्ट्रातही नविन कायदा तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## सुधारित नागरिकत्व कायदा आणि राष्ट्रीय नागरिक नोंदणी (एनआरसी) च्या अंमलबजावणीसाठी स्थानबध्दता केंद्र उभारण्याबाबत

**(२६) * १६३४ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुधारित नागरिकत्व कायदा आणि राष्ट्रीय नागरिक नोंदणी (एनआरसी) ची अंमलबजावणी सुरु झालेली नसताना व कायद्याबाबतच्या मुद्द्यांवर निर्माण झालेल्या वादानंतर देशात कोठेही स्थानबध्दता केंद्र (डिटेन्शन कॅम्प) उभारण्याची प्रक्रिया सुरु नसल्याचे केंद्र शासनाने जाहीर केल्याने राज्य शासनाच्या गृह विभागाने दिनांक ३० नोव्हेंबर, २०१९ रोजी सिडको महामंडळास पत्र पाठवून नवी मुंबईतील नेरुळ येथील भूखंड क्रमांक १४ मधील सावली फाऊंडेशनच्या महिला पोलीस कल्याण केंद्राची इमारत स्थानबध्दता केंद्रास उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशाप्रकारचे स्थानबध्दता केंद्र (डिटेन्शन कॅम्प) उभारण्याबाबत केंद्र शासनाकडून राज्य शासनास काही आदेश दिलेले आहेत काय, सदर आदेश केव्हा देण्यात आले, त्याचे स्वरुप काय आहे, तसेच याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला, निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, राज्य शासनाने वरीलप्रमाणे घेतलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे व ही प्रक्रिया सध्या अकालिक ठरत असल्यामुळे राज्य शासनकडून आता कोणता निर्णय घेण्यात येणार आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात स्थानबध्दता केंद्र (डिटेन्शन कॅम्प) उभारण्याची प्रक्रिया सुरु करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही. सुधारित नागरिकत्व कायदा आणि राष्ट्रीय नागरिक नोंदणी (एनआरसी) याबाबतची राज्यात अमंलबजावणी करण्याच्या अनुषंगाने राज्यामध्ये कोठेही स्थानबध्दता केंद्र (डिटेन्शन कॅम्प) उभारण्याची प्रक्रिया सुरू नाही. तथपि, ज्या परदेशी नागरिकांनी त्यांनी केलेल्या गुन्ह्याच्या अनुषंगाने कारागृहातील शिक्षा पूर्णपणे भोगली आहे परंतु, केवळ राष्ट्रीयत्व सिध्द न झाल्यामुळे त्यांची हद्दपारी प्रलंबित आहे अशा परदेशी नागरिकांना तुरुंगातून मुक्त करुन योग्य त्या नियंत्रित ठिकाणी ठेवण्याकरीता स्थानबध्दता केंद्रे स्थापन करण्याबाबत केंद्रीय गृह मंत्रालयाने दिनांक १० सप्टेंबर, २०१४ च्या पत्रान्वये निर्देश दिले होते. तसेच, केंद्र शासनाच्या दिनांक ९ जानेवारी, २०१९ च्या पत्रान्वये स्थानबध्दता केंद्रासंदर्भात मॅन्युअल निर्गमित केले आहे. तद्नुषंगाने नेरूळ, नवी मुंबई येथे पोलीस विभागाकडे ताब्यात असलेल्या जागेवर तात्पुरते स्थानबध्दता केंद्र सुरु करण्यास सहमती देण्याबाबत तसेच नवी मुंबई परिसरात कायमस्वरुपी स्थानबध्दता केंद्रासाठी तीन एकर जमीन मिळण्याबाबत सिडको महामंडळास विनंती केली आहे. सद्य:स्थितीत, राज्यात स्थानबध्दता केंद्र कार्यान्वित नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईत चित्रपट, मालिकांमध्ये भूमिका देण्याच्या नावाखाली देहविक्री रॅकेट सुरु असल्याबाबत

**(२७) * १७६१ श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत चित्रपट, मालिकांमध्ये भूमिका देण्याच्या नावाखाली तरुणींना वेश्याव्यवसायात ढकलणाऱ्या कास्टिंग डायरेक्टरासह निर्मिती व्यवस्थापकाला समाजसेवा शाखेने अटक केल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका ब्रॅण्डच्या जाहिरातीसाठी परदेशी मुली हव्या असून शरीरसंबंध ठेवावे लागतील असे सांगून तरुणींना वेश्याव्यवसायात ढकलल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार दोषींवर कारवाई करुन मुंबई शहरात अशा प्रकारच्या घटनांना आळा बसण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) हे खरे आहे.

तथापि, मुंबईत चित्रपट, मालिकांमध्ये भूमिका देण्याच्या नावाखाली तरुणींना वेश्याव्यवसायात ढकलणे याबाबत प्रथम खबरी अहवालामध्ये कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही.

(२) व (३) असा कोणताही प्रकार घडल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तथापि, अनैतिक व्यापारास प्रतिबंध घालण्याबाबत करण्यात आलेल्या उपाययोजना पुढीलप्रमाणे आहेत :-

i) मुंबई शहरात स्पा, हॉटेल, खाजगी फ्लॅट या ठिकाणी देहविक्री करीत असल्याची माहिती प्राप्त झाल्यास समाजसेवा शाखा, गुन्हे शाखा, मुंबई विभाग हे बोगस गि-हाईका मार्फतीने वेळोवेळी धाडी टाकून देह विक्री करण्यास प्रवृत्त करणाऱ्या इसमांविरूध्द भा.दं.वि.सं व अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा अन्वये कारवाई करण्यात येते.

ii) पोलीस ठाणे हद्दीतील कार्यान्वित कुंटनखाने, Escorts Service च्या नावाने जाहिरात करून वेश्याव्यवसायासाठी मुंबईतील हॉटेलमध्ये वेश्यागमनाकरीता मुली पुरविणाऱ्या वेबसाईटधारक व वेश्यादलाल यांचेविरूध्द भा.दं.वि.सं व अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा अन्वये कारवाई करण्यात येते.

iii) गुन्ह्यातील इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या वेबसाईटवरून गुन्हे घडत असल्याची शक्यता लक्षात घेवून ती वेबसाईट ब्लॉक/बंद करणेसाठी मा.न्यायालयात विनंती अर्ज सादर करून सदर वेबसाईट इंटरनेटवर दिसणे बंद करणेकरीता संबंधित यंत्रणेच्या नावे आदेश प्राप्त करून सदर वेबसाईट ब्लॉक/बंद करण्यात येतात.

iv) बृहन्मुंबई शहरातील सर्व पोलीस ठाणेतील पोलीस अधिकारी/ अंमलदार यांचेसाठी अनैतिक व्यापार संबंधित काम करणाऱ्या वेगवेगळ्या समाजसेवी संघटनांचे प्रतिनिधी (एन.जी.ओ.), कायदे तज्ञ, अनैतिक मानवी वाहतूक कक्ष, मुंबई येथे कार्यरत असलेले अनुभवी पोलीस अधिकारी यांच्या मार्फतीने कार्यशाळांचे आयोजन करून त्यांना पोलीस ठाणे हद्दीतील कार्यान्वित कुंटनखाने, Escorts Service चे वेबसाईटधारक व वेश्यादलाल यांचेविरूध्द परिणामकारक कशा प्रकारे कारवाई कराव्यात याबाबत मार्गदर्शन देण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालवण (जि.सिंधुदुर्ग) प्रवासी वाहतूक करणाऱ्या नौकांची दुरवस्था झाल्याबाबत

**(२८) * १८६३ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवबाग, तारकर्ली, मालवणच्या समुदात सातत्याने घडणाऱ्या दुर्घटनांमुळे मालवणच्या बंदरे विभागाने नौकांचा सर्व्हे करण्याची मोहिम दिनांक २६ व २७ डिसेंबर, २०१९ या कालावधीत पार पाडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंदरे विभागाने केलेल्या सदरहू सर्व्हे (तपासणी) मध्ये प्रवासी वाहतूक करणाऱ्या ४० नौका खराब स्थितीत असून अनेकांजवळ कागदपत्रेही अपूर्ण असल्याचे, तसेच लाईफ जॅकेट, रिंग बोया अशा सुरक्षेची साधनेही सुस्थितीत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू तपासणीत दोषी आढळून आलेल्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख :** (१) होय.
(२) लाईफ जॅकेट, रिंग बोया सुस्थितीत नसून बोटींची रंगरंगोटी व ऑईलींग आवश्यक असल्याचे निदर्शनास आले व बोटींची कागदपत्रे दाखविण्यात आली नाहीत.
(३) वरील सर्व त्रुटींची पुर्तता करण्यात आल्यानंतर बोटींचा पुन्हा सर्व्हे करुन तात्पुरते सर्व्हे प्रमाणपत्र अदा करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ (एफ) करीता भूसंपादित झालेल्या बाधितांना मोबदला देण्याबाबत

**(२९) * १९५५ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खरवंडी-ब्रम्हनाथ येळंब-आर्वी, खालापुरी-नवगण राजुरी या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ (एफ) च्या रस्त्याकरीता अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करुन भूसंपादनाचा मोबदला शेतकऱ्यांना मिळाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भूसंपादन आणि मोजणी अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे शेकडो शेतकरी भूसंपादनाच्या मोबदल्यापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ (एफ) करीता जमीन संपादित केलेल्या शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) हे खरे नाही.

खरवंडी-ब्रम्हनाथ येळंब आर्वी, खालापुरी-नवगण राजुरी या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ (एफ) च्या रस्त्याकरीता जमीन संपादनाची व निवाडा घोषित करण्याची कार्यवाही अद्याप चालू आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अ) खरवंडी-ब्रम्हनाथ, येळंब-आर्वी, खालापुरी-नवगण राजुरी राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ (एफ) हा अहमदनगर व बीड जिल्ह्यातून जात आहे. सदर महामार्गासाठी अहमदनगर व बीड या दोन्ही जिल्ह्यासाठी सक्षम प्राधिकारी हे केंद्र शासनाच्या रस्ते, परिवहन आणि महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडून दिनांक ३०/१२/२०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये घोषित करण्यात आले आहेत. या महामार्गासाठी अहमदनगर जिल्ह्यातील ५ गावांचा तर बीड जिल्ह्यातील ८ गावांचा समावेश आहे. त्यानुसार कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, औरंगाबाद यांचे कार्यालयाकडून भूसंपादन प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाले आहेत. प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने संयुक्त मोजणीची प्रक्रिया उपअधीक्षक, भूमी अभिलेख यांच्या कार्यालयाकडून प्रगतीपथावर आहे. संयुक्त मोजणीची प्रक्रिया पूर्ण करून घेऊन राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ अंतर्गत कलम ३(A) ची कार्यवाही चालू आहे.

ब) सदर अधिनियमांतर्गत अंतिम निवाडा घोषित करून मावेजा वितरीत करण्याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खानापूर (वीटा) (जि.सांगली) तालुक्यातील गुन्हेगारी रोखण्याबाबत

**(३०) * २०७१ श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाळवणी (ता.खानापूर (वीटा), जि.सांगली) येथील वस्तीवर चोरट्यांनी बंद घराचे कुलूप तोडून श्री.श्रीरंग धनवडे नावाच्या वृध्दावर धारदार शस्त्राने हल्ला करुन दोन लाख दहा हजार इतक्या किंमतीचे, साडे अकरा तोळे वजनाचे दागिने चोरल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाढत्या गुन्हेगारीवर वचक बसवून गुन्हेगारीचे प्रमाण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी विटा पोलीस स्टेशन, जि.सांगली येथे गु.र.नं. ३८/२०२० भा.दं.वि.सं.क. ३०२, ३९४, ३९७, ४५२ प्रमाणे दिनांक २४/०१/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून एका आरोपीस अटक करण्यात आली आहे.

सांगली जिल्हयात गुन्हयांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सी.सी.टि.व्ही. कॅमरे बसविण्यात आलेले आहेत. तसेच जेल रिलीज आरोपींवर वॉच ठेऊन त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई केली जाते. जिल्हास्तरावर व उपविभागीय स्तरावर मालमत्तेचे व शरीराविरुध्द गुन्हे करणारे आरोपी यांची आरोपी आदान प्रदान योजना कार्यान्वित आहे. तसेच रात्र गस्त, मोटार सायकलवरुन दिवसा व रात्री बिट मार्शल पेट्रोलिंग कार्यान्वित आहे. जिल्हयामध्ये अचानक कोंम्बिग ऑपरेशन व नाकाबंदी वेळी संशयितांवर कारवाई केली जाते.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील यंत्रमाग उद्योग बंद होत असल्याबाबत

**(३१) * २१६७ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जागतिक मंदीमुळे सोलापूर जिल्ह्यातील यंत्रमाग उद्योगाच्या उत्पादनात घट झाल्याने हजारो कामगार बेरोजगार झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील यंत्रमाग उद्योग अडचणीत आले असून सोलापूर जिल्ह्यातील बँकाने यंत्रमागधारकांकडून शासनाने दिलेल्या ५ टक्के व्याज सवलतीचा अर्ज भरुन घेतला नसल्याने सदरील योजनेपासून यंत्रमागधारक वंचित राहिल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जागतिक मंदीतून सोलापूर जिल्ह्यातील यंत्रमाग उद्योगाला बाहेर काढून सदर योजनेचा लाभ यंत्रमागधारकांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख :** (१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंब्रा-शिळफाटा-तळोजा मार्गावरील बेकायदेशीर गोदामे बंद करण्याबाबत

**(३२) * ११२ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंब्रा-शिळफाटा-तळोजा मार्गावरील खान कंपाऊंड मधील गोदामांना सोमवार दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी रात्री दोनच्या सुमारास लागलेल्या आगीत एकूण सहा गोदामे जळून नष्ट झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मार्गावरील दहिसर येथील कर्मनगरी एकता कोर्पोरेशन येथे भंगाराच्या गोडाऊनला लागलेल्या आगीत केमिकल ड्रमचा स्फोट होऊन आग आजूबाजूच्या परिसरात पसरली होती, तसेच काही वर्षापूर्वी अशाचप्रकारे जुन्या शस्त्र साठ्यांच्या झालेल्या स्फोटात जिवितहानीही झालेली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंब्रा-शिळफाटा-तळोजा मार्गावरील अनधिकृत व बेकायदेशीर गोडाऊनमुळे या परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास व जिवितास धोका निर्माण झाल्यामुळे सदर मार्गावरील सर्व अनधिकृत व बेकायदेशीर गोडाऊन बंद करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे दिनांक १ जानेवारी, २०२० रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) ठाणे आयुक्तालय क्षेत्रामधील शिळ डायघर पो.स्टे. हद्दीतील खान कंपाऊंड येथे दिनांक ७/०१/२०२० रोजी पहाटे २.४१ वाजता प्लास्टिक भंगार गोडाऊनला लागलेल्या आगीत एकूण ७ गोदामे जळून नष्ट झालेली आहेत. या घटनेबाबत शिळ डायघर पोलीस स्टेशन येथे अकस्मात जळीत रजि.नं. ३/२०२० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

दहिसर येथील कर्मनगरी एकता कार्पोरेशन येथे केमिकलचा स्फोट होऊन आग आजूबाजूच्या परिसरात पसरली होती. तथापि, काही वर्षापूर्वी अशाचप्रकारे जुन्या शस्त्र साठ्याच्या झालेल्या स्फोटात जिवितहानी झालेली नव्हती.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे निवेदन दिनांक २/०१/२०२० रोजी जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कार्यालयात प्राप्त झालेले आहे. तहसिलदार, ठाणे यांनी सदरचे निवेदन दिनांक १५/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये (१) कार्यालयीन अधीक्षक तथा पदनिर्देशित अधिकारी, मुंब्रा प्रभाग समिती, ठाणे

महानगरपालिका, (२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग, ठाणे, (३) ग्रामसेवक, पिंपरी ग्रामपंचायत, (४) ग्रामसेवक, दहिसर ग्रामपंचायत या संबंधित कार्यालयांना पाठविण्यात आलेले आहे.

त्यानुषंगाने, नियमानुसार कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीबाबत संबंधित मा.स्थानिक लोकप्रतिनिधींना कळविण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

तसेच यांसदर्भात सखोल चौकशी करुन आवश्यक कार्यवाही करण्याच्यादृष्टीने संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठक तात्काळ घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वैनगंगा (ता.तुमसर, जि.भंडारा) नदीपात्रातून अवैध रेती उपसा रोखण्याबाबत

**(३३) * ८२५ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैनगंगा (ता.तुमसर, जि.भंडारा) नदीतून बेसुमार अवैधरित्या रेती उपसा होत असल्याने नदीपात्रातील पाणी गावाच्या दिशेने वाहत असून सदर जिल्ह्यातील १२ गावातील ४२ हेक्टर शेतजमीन वाळू उपसामुळे पाण्याखाली गेली असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत ग्रामस्थांनी शासनाकडे तक्रारी देऊनही कोणीतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध रेती उपसा रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने उपाययोजना करण्याबाबत

**(३४) * २०१२ अॅड.हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ज्येष्ठ नागरिकांशी संबंधित गुन्ह्यांमध्ये मागील तीन वर्षात वाढ झाल्याची बाब राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या (एन.सी.आर.बी.) माहितीतून निदर्शनास आली असून मुंबईत ज्येष्ठ नागरिकांना लुबाडणे, चोरी, खून प्रकरणात वाढ झाल्याने ज्येष्ठ नागरिक असुरक्षित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्येष्ठ नागरिकांना किरकोळ मारहाणीच्या १०१२, जबर मारहाणीच्या २२४, विनयभंगाच्या ५३, बलात्काराच्या ६, ज्येष्ठ नागरिकांच्या खुनाच्या १३५ घटनांची नोंद झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण भागातील यंत्रणांच्या कमतरतेमुळे ज्येष्ठांना मदत मिळण्यात अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील ज्येष्ठ नागरिकांच्या लिवित आणि मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) व (२) पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांच्या कार्यक्षेत्रात सन २०१७ ते जानेवारी, २०२० या कालावधीत ज्येष्ठ नागरिकांविरुध्द घडलेल्या गुन्ह्यांची सांख्यिकी माहिती खालीलप्रमाणे आहे.

सन २०१७ व २०१८

| अ. क्र. | शिर्षक | २०१७ | | २०१८ | |
|---|---|---|---|---|---|
| | | दाखल | उघड | दाखल | उघड |
| १ | हत्या | ६ | ६ | ७ | ६ |
| २ | हत्येचा प्रयत्न | २ | २ | ० | ० |
| ३ | सहेतूक हत्या | ० | ० | ० | ० |
| ४ | दरोडा | २ | २ | १ | १ |
| ५ | जबरी चोरी | ५७ | ३९ | ५७ | ५२ |
| ६ | गंभीर मारहाण | ३२ | २३ | २० | २० |
| ७ | किरकोळ मारहाण | ५१ | ४९ | ४६ | ४४ |
| ८ | खंडणी मागणे | ६ | ६ | ११ | ६ |
| ९ | फसवणुक | ४३४ | १२७ | ३०१ | १४२ |
| १० | बलात्कार | १ | १ | २ | २ |
| ११ | विनयभंग | ८ | ५ | १६ | १४ |
| १२ | इतर गुन्हे | ५२५ | ३०५ | ५८२ | ३२९ |

सन २०१९ व जानेवारी, २०२० अखेर

| अ.क्र. | शिर्षक | २०१९ | | जानेवारी, २०२० अखेर | |
|---|---|---|---|---|---|
| | | दाखल | उघड | दाखल | उघड |
| १ | हत्या | ९ | ९ | ० | ० |
| २ | हत्येचा प्रयत्न | ३ | ३ | ० | ० |
| ३ | सहेतूक हत्या | ० | ० | ० | ० |
| ४ | दरोडा | २ | २ | ० | ० |
| ५ | जबरी चोरी | २९ | १९ | १ | ० |
| ६ | गंभीर मारहाण | १७ | १६ | १ | १ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | किरकोळ मारहाण | ५४ | ४७ | ७ | ५ |
| ८ | खंडणी मागणे | ९ | ८ | २ | ० |
| ९ | फसवणुक | ३६९ | १२० | ३५ | ५ |
| १० | बलात्कार | ० | ० | ० | ० |
| ११ | विनयभंग | १० | ६ | १ | ० |
| १२ | इतर गुन्हे | ५५१ | ३१३ | १६ | ६ |

उपरोक्त विवरणपत्रान्वये ज्येष्ठ नागरिकांबाबत किरकोळ मारहाणीच्या १५८, जबर मारहाणीच्या ६१, विनयभंगाच्या ३५, बलात्काराच्या ३ तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या खुनाच्या २२ घटना मागील ३ वर्षात घडलेल्या आहे.

(३) हे खरे नाही.

(४) ज्येष्ठ नारिकांना मदत मिळणेसाठी पोलीस ठाणे पातळीवर पोलीस बीट अंमलदार यांचे पेट्रोलिंग ठेवण्यात आलेले आहेत तसेच वेळोवेळी मिटींग घेवून प्रबोधन केले जाते. त्याचप्रमाणे तयार केलेल्या व्हॉट्सॲप गुपच्या माध्यमातून माहिती मिळताच त्यांना तातडीने मदत पुरविली जाते. तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या समस्येचे वेळेत निरसन केले जाते. प्रत्येक पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात ज्येष्ठ नागरिक सुरक्षा समिती स्थापन करण्यात आली असून पो.स्टे. प्रभारी अधिकारी यांच्यामार्फत सदर समितीची दरमहा बैठक आयोजित करण्यात येते.

ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेबाबत वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे आडगाव बु. व गांधेली (ता.जि.औरंगाबाद) येथील जमीन गैरव्यवहाराबाबत

**(३५) * २३७४ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आडगाव बु. (ता.जि.औरंगाबाद) येथील गट नंबर ५२, ७९ व १३५ एकूण जमीन क्षेत्र ९१ एकर २८ गुंठे आणि गांधेली (ता.जि.औरंगाबाद) येथील गट नंबर २९३ मधील क्षेत्र ३६ हे. ५९ आर ही जमीन दिनांक २१/१२/२०१८ पूर्वी शासकीय जमीन होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २१/१२/२०१८ रोजी वा त्यादरम्यान मृत व्यक्तीला प्रतिवादी करुन तत्कालीन अप्पर तहसिलदार व तत्कालीन मंडळ अधिकारी यांनी त्यांच्या अधिकाराचा दुरुपयोग करुन खाजगी व्यक्तीशी संगनमत करुन सदर शासकीय जमीन खाजगी व्यक्तीच्या नावे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्नांकित गटातील एकूण क्षेत्र ९१ एकर २८ आर. व ३६ हेक्टर ५९ आर. जमीन श्री.चंदुलाल मुन्नालाल मारवाडी यांच्या खाजगी मालकीच्या असून, त्या श्री.ज्वालादास भूरादास यांनी दिनांक २२/०४/१९४० रोजी रुपये ७०८०/- इतक्या रकमेत खरेदी केलेली असल्याने, त्याआधारे उक्त जमिनीच्या गांव नमुना नं. ७/१२ मध्ये श्री.ज्वालादास भूरादास यांच्या नावाची नोंद करण्यात आली आहे. त्याविरूध्द श्री.कचरू लिंबा सावंत व इतर यांनी अपर तहसिलदार, औरंगाबाद यांचे न्यायालयात अपील दाखल केले होते. सदर प्रकरणी अर्धन्यायिक सुनावणी होऊन, अपर तहसिलदार यांनी दिनांक २१/१२/२०१८ रोजी हैद्राबाद कुळ वहिवाट आणि शेतजमीन अधिनियम, १९५० चे कलम ३८ (ई) नुसार, अर्जदार श्री.कचरू लिंबा सावंत व इतर यांना जमिनीचे कुळ म्हणून घोषित करण्याबाबतचे अर्धन्यायिक स्वरूपाचे आदेश

पारीत केले आहेत. सदर आदेशाविरूध्द जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे न्यायालयात हैद्राबाद कुळ वहिवाट आणि शेतजमीन अधिनियम, १९५० चे कलम ९० नुसार दाद मागितली आहे. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी उभय पक्षकारांना त्यांचे म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी देऊन प्रकरण निर्णयासाठी राखीव ठेवले आहे.

-----------------

## उंबरवाडी (ता.सुधागड, जि.रायगड) येथील कुटुंबांना वाळीत टाकल्याबाबत

**(३६) * ५७ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंबरवाडी (ता.सुधागड, जि.रायगड) येथील निवृत्त पोलीस कर्मचारी हाशा नामा हंबीर आणि मांगे या २ कुटुंबांना माहे नोव्हेंबर, २०१९ पासून गावाने वाळीत टाकले असून याप्रकरणी पाली पोलीस ठाण्यात २३ जणांवर माहे डिसेंबर, २०१९ च्या पहिल्या आठवड्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गावपंचायतीच्या त्रासाला कंटाळून पिडीत कुटुंबातील विवाहित सौ. पिकीं मांगे हिने दिनांक ४ नोव्हेंबर, २०१९ रोजी विष प्राशन करुन आत्महत्येचा प्रयत्न केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिडीत कुटुंबाने न्याय मिळण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक, अलिबाग, राज्य महिला आयोग, मुंबई आणि महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कुटुंबियांना वाळीत टाकणाऱ्या विरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय, सदर प्रकरणी १५ आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) गावातील महिलांनी सौ.पिंकी मांगे हिच्याकडे ग्रामस्थांविरूध्द तक्रार केल्याबाबत विचारणा करून, भांडण केल्यामुळे सदर गोष्टीचा राग येवून सौ.पिंकी मांगे हिने घरातील फिनेल व युरीया खत प्राशन केले.

(३) व (४) श्री.हशा हंबीर यांनी ग्रामस्थांविरूध्द मा.न्यायालयात दावा दाखल केला. मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार नागोठाणे पोलीस ठाण्याकडून चौकशी करण्यात आली. चौकशीमध्ये आरोपी यांनी कोणत्याही प्रकारे हशा हंबीर यांना त्रास दिलेला नसल्याबाबत दिसुन आले. तसा अहवाल नागोठाणे पोलीस ठाण्याकडून मा.न्यायालयात सादर करण्यात आला आहे.

सौ.पिंकी मांगे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पाली पोलीस ठाणे येथे १५ आरोपींविरूध्द भा.दं.वि.सं. कलम १५३ (अ), ५०४, ५०६, ३४ सह महाराष्ट्र बहिष्कार (प्रतिबंध, निषेध व निवारण) अधिनियमाच्या कलम ५ अन्वये गु.र.क्र. ७७/२०१९ दाखल करण्यात आला असून, सदर गुन्ह्याचा पोलीस तपास चालु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पोलीस उपमहानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, पुणे यांनी तरुणीचा विनयभंग केल्याबाबत

**(३७) * ३१४ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे मोटार परिवहन (एम.टी.) विभागात कार्यरत असलेल्या पोलीस उपमहानिरीक्षक (डीआयजी) यांच्यावर अश्लील वर्तन केल्याप्रकरणी दिनांक २६ डिसेंबर, २०१९ रोजी पोस्कोंतर्गत तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस उपमहानिरीक्षकाविरोधात (डीआयजी) विनयभंगाचा आरोप करणारी अल्पवयीन तरुणी घरातून बेपत्ता झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अल्पवयीन तरुणीचा विनयभंग केल्याप्रकरणी दोषीवर कारवाई करुन बेपत्ता तरुणीचा शोध घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय.

(२) होय.

(३) अल्पवयीन तरुणीच्या विनयभंग प्रकरणी फिर्यादी यांचे फिर्यादीवरून तळोजा पोलीस ठाणे येथे भा.दं.वि.सं. कलम ३५४(अ)(१)(१), ५०६ सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ८, ९(अ)(४), १० अन्वये गुन्हा नोंद केला असून, आरोपीस मा.उच्च न्यायालयाने अंतरीम अटक पूर्व जामिन मंजूर केला आहे.

तसेच अल्पवयीन तरूणी बेपत्ता झाल्याबाबत तळोजा पोलीस ठाणे भा.दं.वि.स. कलम ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल असून, सदर मुलीचा पोलिसांमार्फत शोध घेवून तीला देहरादून येथुन ताब्यात घेण्यात आले आहे. सदर प्रकरणात आरोपीस अटक करण्यात आली असून, गुन्हा सद्य:स्थितीत पोलीस तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) शहरातील महा ई-सेवा केंद्रातून बनावट जातीचे दाखले देण्यात येत असल्याबाबत

**(३८) * २१११ श्री.रविंद्र फाटक, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) शहरातील फिरोज नजीर शेख यांच्याकडून चालविण्यात येणाऱ्या महा ई-सेवा केंद्रात रीतसर अर्ज करुनही कित्येक दिवस आदिवासी तरुणांना जातीचे दाखले मिळत नसून जादा रुपये ५००/- दिल्यास

याच केंद्रातून एका दिवसात बनावट जातीचे दाखले मिळत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने प्रांताधिकाऱ्यांनी सदर महा ई-सेवा केंद्रावर छापा टाकला असता या ठिकाणाहून सन २०१४ पासूनचे जवळपास २५० पेक्षा जास्त बनावट दाखले आढळून आले असून सदरहू दाखल्याची पडताळणी सुरु आहे तसेच या महा ई-सेवा केंद्रातून रुपये ५००/- जादा आकारुन एक दिवसात देण्यात येणाऱ्या जातीच्या दाखल्याची पडताळणी केली असता सदरहू दाखल्यांची नोंद तहसिल किंवा प्रांत कार्यालयात नसल्याची तसेच या प्रमाणपत्रावर प्रांताधिकाऱ्यांची बनावट स्वाक्षरी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी संबंधित केंद्र चालकावर कारवाई करण्याची मागणी आदिवासी संघटनांनी शासनाकडे केली आहे तसेच राज्यात अशाप्रकारच्या बनावट दाखले देण्याबाबतची किती प्रकरणे निदर्शनास आली आहेत,

(४) असल्यास, प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) होय, उपविभागीय अधिकारी, जव्हार यांचे कार्यालयाकडे दिनांक २२/०१/२०२० रोजी प्राप्त झालेल्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने, सहायक जिल्हाधिकारी जव्हार यांनी दिनांक २३/०१/२०२० रोजी श्री.फिरोज शेख यांच्या महा ई-सेवा केंद्र, जामसर, जव्हार येथे अचानक भेट देऊन तपासणी केली असता, सदर ई-सेवा केंद्रात एकूण १३ बनावट जातीचे दाखले व ७ बनावट शिक्के आढळून आले. सदरचे बनावट दाखले व बनावट शिक्के पंचासमक्ष ताब्यात घेण्यात आले आहेत.

सदर केंद्राची तपासणी करताना अर्जदारांनी जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेले व कार्यवाहीसाठी प्रलंबित असलेले एकूण २१२३ अर्ज आढळून आले आहेत.

श्री.फिरोज शेख यांचेविरुध्द पोलीस ठाणे, जव्हार येथे भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ४७२, ४७३, ४७४ अन्वये FIR No. ००१६ दिनांक २५/०१/२०२० दाखल केला आहे. सद्य:स्थितीत सदर महा ई-सेवा केंद्र बंद (Seal) करण्यात आले आहे.
(५) अशी बाब नाही.

-----------------

## जिंतूर (जि.परभणी) येथील पोलीस वसाहतीची दुरुस्ती करण्याबाबत

**(३९) * १२३४ श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिंतूर (जि.परभणी) येथील पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाची दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील पाच वर्षात दुरुस्तीकरीता लाखो रुपयांचा खर्च करुनही वसाहत दुरवस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पोलीस वसाहतीची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईमार्गे भारताबाहेर रक्तचंदनाची तस्करी होत असल्याबाबत

**(४०) * ५८८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने सांताक्रुझ येथून रुपये ८ कोटींचे तर छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर एका सुदानी नागरिकाकडून १७ किलो रक्तचंदन हस्तगत केले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दक्षिण भारतामध्ये मोठे आंतरराष्ट्रीय तस्करी रॅकेट सक्रिय असून ते मुंबईमार्गे भारताबाहेर दुर्मिळ रक्तचंदनाची तस्करी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रक्तचंदनाची तस्करी करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय.

(२) होय.

(३) होय, या प्रकरणी गुन्हे प्रकटीकरण शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई येथे कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७४, १२० (ब), ३७९, ३४ भा.दं.वि. सह भारतीय वन कायदा १९२७ कलम ४१, ४२ सह महाराष्ट्र वन नियम, २०१४ कलम ३१, ८२ सह महाराष्ट्र वृक्ष संरक्षण व संवर्धन कायदा कलम ३, ४ अन्वये खालीलप्रमाणे २ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

१) गु.र.क्र. १०९/२०१९ (सांताक्रुझ पोलीस ठाणे गु.र.क्र. ३६९/२०१९) सदर गुन्ह्यात १२ आरोपींना अटक करण्यात आली आहे.
२) गु.र.क्र. १९१/२०१९ (सहार पोलीस ठाणे गु.र.क्र. ४४६/२०१९) सदर गुन्ह्यात ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.
प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात महसूल विभागाच्या संगणकीय ७/१२ पत्रकावर जमीन कसणाऱ्याच्या नावाचा कॉलम घेणेबाबत

**(४१) * ११९ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, ॲड.हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महसूल विभागाच्या तलाठी कार्यालयामध्ये ७/१२ पत्रकी जमीन कसणाऱ्याच्या नावाचा कॉलम ब्रिटीश काळापासून दाखल असून तलाठी कार्यालयामधील संगणकीय ७/१२ पत्रकी जमीन कसणाऱ्याचे नाव हा कॉलम वगळण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मध्ये दुरुस्ती न करता महसूल विभागाने संगणकीय ७/१२ पत्रकी जमीन कसणाऱ्याचे नाव हा कॉलम वगळला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जमीन कसणाऱ्याच्या नावाचा कॉलम ७/१२ पत्रकी घेण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) राज्यात महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २९ अन्वये तयार केलेल्या महाराष्ट्र जमीन नियमपुस्तिका (खंड-४) मध्ये प्रत्येक गावात अधिकार अभिलेख ठेवण्याबाबत विविध नोंदवहयांसाठी गाव नमुना नंबर विहित केलेले आहेत. या गाव नमुन्यातील गा.न.नं.७ या नमुन्याचे शीर्षक “अधिकार अभिलेख पत्रक” असून गा.न.नं. १२ या नमुन्याचे शीर्षक “पीकांची नोंदवही” असे आहे. तसेच, गाव नमुना नंबर ७-ब मध्ये शेती कसणाऱ्या व्यक्तीची नोंद ठेवण्यात येते.

महाराष्ट्र जमीन नियमपुस्तिका (खंड-४) नुसार फक्त गा.न.नं. ७ आणि १२ यांचा एकत्रित नमुन्याचे ठेवण्याचे विहित करण्यात आले आहे. महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख व नोंदवहया (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१ मधील नियम ३,५,६,७ व २९ नुसार गा.न.नं. ७/१२ चा उतारा ठेवण्यात येतो. तसेच, शासन परिपत्रक दिनांक २४/११/१९९७

अन्वये, महाराष्ट्र जमीन नियमपुस्तिका (खंड-४) मध्ये विहित केलेल्या नमुन्यातच गा.न.नं. ७/१२ चा उतारा वापरण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार, विहित नमुन्यात सदरहू उतारा ठेवण्यात येत आहे. त्याच धर्तीवर संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ चा उतारा देण्यात येत आहे.

जमीन धारकाव्यतिरिक्त शेती कसणाऱ्या व्यक्तीची नोंद गा.न.नं. ७ब मध्ये ठेवण्यात येते. ज्यांना अशा नोंदी तपासावयाच्या आहेत किंवा त्याची प्रत आवश्यक आहे अशा व्यक्तींना गा.न.नं. ७ब ची प्रत संबंधित तलाठी कार्यालयातून मिळू शकेल.

-----------------

## नागपूर येथे नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(४२) * १७०४ श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे नायलॉन मांज्याला बंदी असतानाही नायलॉन माज्याची विक्री होत असल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नायलॉन मांज्यामुळे नागपूरात पंधरा नागरिक जखमी झाल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैधरित्या नायलॉनच्या मांज्याची विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय.

(२) नागपूर शहर व ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत याबाबत नोंद आढळून आली नाही.

(३) नागपूर शहरात अवैधरित्या नायलॉनच्या मांज्याची विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यावर कलम ५,१५ पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ सह कलम १८८ भादंवीप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील ब्लॅक स्पॉटवरील अपघात रोखण्याबाबत

**(४३)** * **२३०१ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील अपघाती मृत्यूमध्ये घट होत असली तरी मुंबईतील ५८ ब्लॅक स्पॉटवर गेल्या तीन वर्षांत ८९० अपघात घडले असून यांमध्ये १८८ नागरिकांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईतील ५८ ब्लॅक स्पॉटवर होत असलेले अपघात रोखण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) मुंबई शहरमध्ये मागील तीन वर्षामध्ये ५८ ब्लॅक स्पॉटवर ९०३ अपघात झाले असून त्यामध्ये २०३ नागरिकांचा मृत्यू झाला आहे.
(२) मुंबई शहरातील ५८ ब्लॅक स्पॉटवरील अपघात रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

- मुंबईतील ब्लॅक स्पॉटच्या ठिकाणी अपघात प्रवण क्षेत्र असल्याबाबतचे फलक लावण्यात आले आहेत.
- वाहतूक नियमनाकरीता ब्लॅक स्पॉटच्या ठिकाणी गरजेनुसार वाहतूक अंमलदारांची नेमणूक करण्यात येते.
- काही ब्लॅक स्पॉट ठिकाणावर पादचारी अनियंत्रितपणे रस्ता पार करीत असल्याने अपघात होतात. याकरीता स्कायवॉकचा वापर करण्याच्या सूचना देऊन त्यांना त्याबाबत उद्युक्त करण्यात येते.

- वाहतूक पोलिसांच्या शिक्षण विभागामार्फत शालेय विद्‌यार्थ्यांना रोड सेफ्टी पेट्रोलींग विषयक प्रशिक्षण देण्यात येते.
- वाहतूक सुरक्षा पंधरवडा आयोजित करून वाहन चालक, रिक्षा-टॅक्सी चालक यांच्याकरीता फलक बॅनर्स व सभा आयोजित करून वाहतूक नियम पाळण्याबाबत प्रबोधन करण्यात येते. तसेच दुचाकी चालकांना हेल्मेट परिधान करण्याबाबत पथनाटय व पोस्टरव्दारे जनजागृती करण्यात येते.
- रस्ते अपघातावर नियंत्रण ठेवण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते महामंडळ, मुंबई महानगरविकास प्राधिकरण यांच्याकडून अभियांत्रिकी उपाययोजना (रस्ता दुरूस्ती, रस्त्यावरील पुरेशी लाईट व्यवस्था, थर्मोप्लास्टीक रोड मार्किंग इ.) करण्यात येतात.
- अत्याधुनिक ब्रेथ ॲनालायझर मशीनव्दारे ड्रंक ॲण्ड ड्राईव्ह मोहिमेंतर्गत कारवाई करण्यात येते.
- वाहतूक नियमन व नियंत्रण करण्याकरीता सी.सी.टि.व्ही.व्दारे निगराणी करण्यात येते.
- वाहतूक नियमांचे उल्लघंन करणाऱ्या चालकांविरुध्द नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरात नाईटलाईफ चालू ठेवण्याच्या निर्णयामुळे कायदा व सुव्यवस्था निर्माण झाल्याबाबत

**(४४) * १५११ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात नाईटलाईफ या संकल्पनेनुसार शासनाने शहरातील नरिमन पॉईट, काला घोडा, वांद्रे बीकेसी, मॉल्स व दुकाने २४ तास चालू ठेवण्याचा निर्णय प्रायोगिक तत्वावर दिनांक १७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास घेतला असून सदर निर्णयाची अंमलबजावणी दिनांक २६ जानेवारी, २०२० रोजीपासून करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयामुळे मुंबई शहरात कायदा व सुव्यवस्था तसेच अन्य समस्या निर्माण होणार नाहीत, याबाबतचा सर्वकष अभ्यास करण्यात आला आहे काय, या प्रस्तावाचे स्वरुप काय आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, याबाबतचा सर्वकष अभ्यास करण्यात आलेला आहे. तसेच मुंबई शहरातील ठराविक ठिकाणी (Gated Establishment) २४/७ मुंबईची संकल्पना राबविण्यात येत असून त्या ठिकाणी संबंधित पोलीस स्टेशनमार्फत योग्य ती कारवाई करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य सुरक्षा मंडळाच्या सुरक्षारक्षकांच्या समस्यांबाबत

**(४५) * १७७० श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य सुरक्षा मंडळाच्या सुरक्षारक्षकांना किमान वेतन मिळत नसणे, त्यांना पुरविले जाणारे साहित्य अनेक ठिकाणी प्रलंबित असणे अशा विविध प्रकारच्या समस्या सुरक्षारक्षकांना असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतांश शासकीय आस्थापनांमध्ये मंडळाचे सुरक्षारक्षक घेण्याऐवजी त्याठिकाणी खाजगी एजन्सीच्या सुरक्षारक्षकांची नेमणूक केली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक खाजगी एजन्सीची मुदत संपली असतानाही बेकायदेशीररित्या त्यांचे करार कायम करण्यात येत असून यामध्ये शासकीय अधिकारी व खाजगी एजन्सीच्या मालकांचे संगनमत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सुरक्षारक्षकांच्या समस्या सोडविण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) हे खरे नाही.

(२) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ अधिनियम २०१० अन्वये शासकीय आस्थापनांवर महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे सुरक्षारक्षक नेमणे अनिवार्य आहे. ज्या शासकीय आस्थापनांवर वरील नमुदप्रमाणे कार्यवाही केली जात नाही त्यांना महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळातर्फे वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात येतो.

(३) अनधिकृतपणे चालविण्यात येणाऱ्या खाजगी सुरक्षा यंत्रणावर कारवाई करण्यात येत आहे.

(४) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळातर्फे नियुक्त सुरक्षारक्षकांना ईपीएफ, ईएसआयसी, अपघात विमा, मेडिक्लेम पॉलिसी, वेळोवेळी मासिक मोबदल्यात वाढ, सानुग्रह अनुदान, आकस्मित खर्च, उत्तेजनार्थ रोख रक्कम, प्रशस्ती पत्र देणे, अशाप्रकारच्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रामनगर (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथे ग्रामीण धान्य गोदाम बांधकामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४६) * १९७७ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी विभागांतर्गत केंद्र शासनाचे ग्रामीण धान्य गोदाम बांधकाम करण्यासाठी ५०% अनुदान मौजे रामनगर (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथे रुपये ११.५० लक्ष जिल्हा कृषी अधीक्षक यांनी अदा केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण धान्य गोदाम मापदंड प्रमाणे व निकषाप्रमाणे झालेले नाही, याबाबत चौकशी करुन जिल्हाधिकारी, वाशिम यांनी दोषींवर कारवाई करा असे आदेश दिनांक ३/०४/२०१८ रोजी पारित केले असूनही दोषींवर वसुलीची व फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांनी दिलेल्या तांत्रिक मान्यतेच्या अधिन राहून मोजमाप पुस्तकात शाखा अभियंता यांनी नोंदविलेल्या मापानुसार व त्यांचेकडील पूर्णत्वाचे प्रमाणपत्रानुसारच देय होत असलेल्या अनुदानाची अदायगी करण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील ७/१२ उतारे ऑनलाईन करण्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(४७) * २१७० श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.किशोर दराडे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना शेत जमिनीचे ७/१२ उतारे हे ऑनलाईन स्वरुपात मिळत आहे, सदर ७/१२ उतारे मिळणे कामी तयार करण्यात आलेले संकेतस्थळ सतत खंडित असल्याने शेतकऱ्यांना ऑनलाईन ७/१२ उतारे उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील ७/१२ उतारे ऑनलाईन करण्याचे काम पूर्ण झालेले नसल्याने ७/१२ वेंडिंग मशीन गेल्या दोन वर्षापासून सेतू कार्यालयात विनावापर पडून असल्याचे तसेच मंगळवेढे (जि.सोलापूर) तालुक्यातील दुष्काळी अनुदान, उतारे दुरुस्ती, अनेक कामे महसूल विभागाच्या दुर्लक्षामुळे प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांची कामे होत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ७/१२ उतारे संकेतस्थळ अधिक कार्यक्षम करणे तसेच ७/१२ उतारे ऑफलाईन स्वरुपात ठेवण्याबाबत शासनाने कार्यवाही केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) जमाबंदी आयुक्त कार्यालयातर्फे https://aapleabhilekh.mahabhumi.gov.in/dslr या संकेतस्थळावरून ऑनलाईन पेमेंट भरून डिजीटल स्वाक्षरीत गा.न.नं. ७/१२ उपलब्ध करून देण्यात आले आहेत. काही कारणाने संकेतस्थळावरून गा.न.नं. ७/१२ उपलब्ध होण्यास अडचण असल्यास जनतेची गैरसोय होऊ नये म्हणून तलाठी

यांचेकडील अभिलेख वितरण प्रणाली (Document Distribution Module) मधून तलाठी यांचे स्वाक्षरीने गा.न.नं. ७/१२ वितरीत केले जातात. तसेच https://bhulekh.mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर विनाशुल्क डिजीटल स्वाक्षरी नसलेला माहितीसाठीचा गा.न.नं. ७/१२ उपलब्ध आहे.

सोलापूर जिल्ह्यातील गा.न.नं. ७/१२ संगणकीकरणाचे कामकाज १००% पूर्ण झाले असून, डिजीटल स्वाक्षरीत करण्याचे कामकाज ९७.३०% झाले आहे. उर्वरित कामकाज प्रगतीत आहे. तसेच, सद्य:स्थितीत मंगळवेढे तालुक्यातील गा.न.नं. ७/१२ डिजीटल स्वाक्षरीत करण्याचे कामकाज ९९.३०% पूर्ण झाले आहे. सेतू कार्यालयातील गा.न.नं. ७/१२ वेंडिग मशीन तांत्रिक कारणाने बंद असल्याने, महा ई-सेवा केंद्र व आपले सरकार सेवा केंद्रातून ऑनलाईन गा.न.नं. ७/१२ उतारा प्राप्त करुन घेणेची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सध्या संपूर्ण राज्यात ऑनलाईन पध्दतीने गा.न.नं. ७/१२ जतन व वितरीत केले जात असल्याने ऑफलाईन स्वरूपात गा.न.नं. ७/१२ उपलब्ध करून देण्याचे कोणतेही प्रयोजन नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळवा (जि.ठाणे) येथील औषध विक्रेत्याची गोळ्या घालून निर्घुण हत्या केल्याबाबत

**(४८) * ७२ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवा (जि.ठाणे) पूर्व येथील वीर युवराज मेडिकलमध्ये दिनांक २८ डिसेंबर, २०१९ रोजी पहाटे ४ वाजता चोरीच्या उद्देशाने आलेल्या चोरट्यांनी दुकानात झोपलेला कर्मचारी प्रेमसिंग राजपुरोहित याची गोळ्या घालून निर्घुण हत्या करुन दुकानातील रोकड घेऊन आरोपी पसार झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू खूनी आरोपी आणि त्यांच्यासोबत असलेल्या दोन महिलांचे सी.सी.टि.व्ही. फुटेज उपलब्ध झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू खूनी आरोपी व त्याच्या साथीदार महिलांना पकडून त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणी कळवा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ६०२/२०१९ भा.दं.वि., कलम ३०२, ४५२, ४५७, ३८०, ४५८ सह भा.ह.का. कलम ३, २५, २७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी न्यायालयीन कस्टडीमध्ये असून तपास सुरु आहे..
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यात जमीन विक्रीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४९) * ७७० डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यात मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामात अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी मूळ मालकाऐवजी दुसरा बनावट मालक उभा करुन विक्री केल्याचा प्रकार निदर्शनास आला असून तसेच, परराज्यात राहणारे व कामानिमित्त मुंबई-पुणे येथे वास्तव्यास असणाऱ्या जमीन मालकाची फसवणूक करुन दलालामार्फत जमीन विक्री करुन करोडाचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माणगाव (जि.रायगड) तालुक्यातील आदिवासी मालकाची फसवणूक करुन परस्पर जमीन विक्रीचे प्रकार निदर्शनास आले असून माणगाव, दिव गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी शासकीय अधिकाऱ्यांनी बनावट मालक आणि खोत उभा करुन ३५० एकर जमीन परस्पर विकल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जमीन गैरव्यवहार प्रकरणी मंडळ अधिकारी आणि नायब तहसिलदार यांना निलंबित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कारवाई करुन जमीन गैरप्रकारे विक्री प्रकरणी नुकसानग्रस्त मूळ जमीन मालकास न्याय देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(२), (३) व (४) माणगांव (जि.रायगड) तालुक्यातील आदिवासी मालकाची फसवणूक करुन परस्पर जमीन विक्री केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. मात्र मौजे दिव ता.रोहा, जि.रायगड येथील गट नंबर १३३, क्षेत्र १३७-२५.०६ हे.आर ही सरकारी खाजण असलेल्या जमिनीची नोंद तत्कालीन प्रभारी तहसिलदार यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम १५५ अन्वये कमी करुन दरसाल कबुलायतदार खोती अशी करणेबाबत आदेश पारीत केले होते. सदरच्या नोंदी उपविभागीय अधिकारी, रोहा यांनी प्रकरणाची शहानिशा करुन सदर मिळकतीसंदर्भातील आदेश व त्यानुषंगाने घेण्यात आलेल्या फेरफार नोंदी रद्द केल्या आहेत. त्यानुसार गाव दप्तरी फेरफार क्र.२५८ अन्वये सदरच्या नोंदी रद्द करुन गा.न.नं. ७/१२ मूळ स्थितीत आणण्यात आलेला आहे. सदर प्रकरणात तत्कालीन प्रभारी तहसिलदार, रोहा यांना दिनांक ३०/०८/२०१९ च्या आदेशान्वये तसेच मंडळ अधिकारी, चणेरा यांना दिनांक ०६/०९/२०१९ च्या आदेशान्वये निलंबित करण्याची कारवाई करण्यात आलेली होती. तद्नंतर विभागीय आयुक्त, कोकण यांचे आदेश दिनांक २४/०१/२०२० अन्वये तत्कालीन प्रभारी तहसिलदार, रोहा यांना व जिल्हाधिकारी, रायगड कार्यालय यांचे दिनांक १५/०१/२०२० च्या आदेशान्वये संबंधित मंडळ अधिकारी यांना पुनर्स्थापित करण्यात आले आहे. तसेच संबंधितांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतूदी अन्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथील व्यावसायिकाकडून खंडणी मागितल्याबाबत

**(५०) * १०२९ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) कॅम्प नं.५ सेक्शन ३५ येथील कार्यालयासमोर दिपक सोंडे यांच्यासह त्यांच्या चार हस्तकांनी व्यावसायिक नरेश रोहरा यांना जीवे मारण्याची धमकी देऊन त्यांच्याकडे रुपये एक कोटींची खंडणी मागितल्याबाबत हिललाईन पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आल्याचे दिनांक ५/१/२०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय.

(२) होय.

हिललाईन पोलीस ठाणे गु.र.क्र. ६/२०२० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीच्या मोबाईलचे सीडीआर, एसडीआर, टॉवर लोकेशनव्दारे आरोपीचा शोध घेण्यात येत आहे. गुप्त बातमीदार नेमून आरोपीच्या घरी, उल्हासनगर, अंबरनाथ, कल्याण तसेच आजूबाजूच्या परिसरात शोध घेऊनही आरोपीच्या ठावठिकाणाबाबत माहिती मिळालेली नाही. आरोपी तसेच इतर चार अनोळखी आरोपींचा कसोशीने शोध घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यात सिंचन विहिरीकरीता विद्युत जोडणीचा निधी देण्याबाबत

**(५१) * १६५१ श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना या माध्यमातून सिंचन विहिरींकरीता लाभार्थ्यांना विद्युत जोडणीकरीता देण्यात येणारा निधी गत तीन वर्षापासून एकाही लाभार्थ्याला दिला नसल्याने शेतकरी सदर विहिरीचे पाणी घेण्यापासून वंचित राहिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सिंचन विहिरीकरीता विद्युत जोडणीचा निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेंतर्गत सन २०१६-२०१७ मध्ये १०८५, सन २०१७-२०१८ मध्ये ५६४ व सन २०१८-२०१९ मध्ये ३८१ इ. लाभार्थ्यांना वीज जोडणी आकार या घटकाचा लाभ देण्यात आला आहे. तसेच बिरसा मुंडा कृषी योजनेंतर्गत सन २०१६-२०१७ मध्ये ४१, सन २०१७-२०१८ मध्ये ७१ व सन २०१८-२०१९ मध्ये ११७ इ. लाभार्थ्यांना वीज जोडणी आकार या घटकाचा लाभ देण्यात आला आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दिघी (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) येथील पोलीस शिपायांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(५२) * ५९९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील दिघी सागरी पोलीस ठाण्यांतर्गत ३७ गावांसाठी ४४ पोलीस शिपाई पदे मंजूर असून फक्त १७ पोलिसांवर संपूर्ण परिसरातील कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी दिल्यामुळे या पोलिसांवर कामाचा ताण पडत असल्याचे दिनांक ९ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दिघी सागरी पोलीस ठाण्यांतर्गत पोलीस शिपायांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) व (२) दिघी सागरी पोलीस ठाण्यांतर्गत पोलीस शिपायांची ३० पदे मंजूर असून १९ पदे भरलेली आहेत व ११ पदे रिक्त आहेत. पोलीस ठाण्यांतर्गत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याकडून तसेच पोलीस मुख्यालयातून पोलीस कर्मचारी पुरविण्यात येतात. रायगड पोलीस घटकातील पोलीस शिपाई संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक ०३/०९/२०१९ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

# मुंबईतील उच्चभ्रू परिसरातील देहविक्रय रॅकेटना कायमस्वरूपी आळा घालण्याबाबत

**(५३) * २२९८ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुहू, मुंबई येथील झेड लक्जरी रेसिडेन्सी या चतुर्थ तारांकित हॉटेलमध्ये धाड टाकून देहविक्रय रॅकेट चालवणाऱ्या बॉलिवूडमधील एका निर्मिती व्यवस्थापकाला (प्रॉडक्शन मॅनेजर) जुहू पोलिसांनी दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे डिसेंबर, २०१९ मध्ये कुलाबा येथील एका हॉटेलमध्ये ऑनलाईन पध्दतीने सुरू असलेले देहविक्रय रॅकेट, तसेच प्रभादेवी येथील एका इमारतीत स्पा सेंटरच्या नावाखाली सुरु असलेले देहविक्रय रॅकेट मुंबई पोलिसांनी धाड टाकून उध्वस्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील उच्चभ्रू परिसरात सुरु असलेल्या देहविक्रय रॅकेटना कायमस्वरूपी आळा घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) व (२) होय.

(३) देहविक्रय घटनेंबाबत जुहू, कुलाबा व दादर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात आली असून सद्य:स्थितीत सदर गुन्ह्यांचा पोलीस तपास चालू आहे.

अनैतिक व्यापारास प्रतिबंध घालण्याबाबत करण्यात आलेल्या उपाययोजना पुढीलप्रमाणे आहेत :-

i) मुंबई शहरात स्पा, हॉटेल, खाजगी फ्लॅट या ठिकाणी देहविक्री करीत असल्याची माहिती प्राप्त झाल्यास समाजसेवा शाखा, गुन्हे शाखा, मुंबई विभाग हे बोगस गिऱ्हाईकांमार्फतीने वेळोवेळी धाडी टाकून देह विक्री करण्यास प्रवृत्त करणाऱ्या इसमांविरूध्द भा.दं.वि.सं व अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा अन्वये कारवाई करण्यात येते.

ii) पोलीस ठाणे हद्दीतील कार्यान्वित कुंटनखाने, Escorts Service च्या नावाने जाहिरात करून वेश्याव्यवसायासाठी मुंबईतील हॉटेलमध्ये वेश्यागमनाकरीता मुली पुरविणाऱ्या वेबसाईटधारक व वेश्यादलाल यांचेविरूध्द भा.दं.वि.सं व अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा अन्वये कारवाई करण्यात येते.

iii) गुन्ह्यातील इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या वेबसाईटवरून गुन्हे घडत असल्याची शक्यता लक्षात घेवून ती वेबसाईट ब्लॉक/बंद करणेसाठी मा.न्यायालयात विनंती अर्ज सादर करून सदर वेबसाईट इंटरनेटवर दिसणे बंद करणेकरीता संबंधित यंत्रणेच्या नावे आदेश प्राप्त करून सदर वेबसाईट ब्लॉक/बंद करण्यात येतात.

iv) बृहन्मुंबई शहरातील सर्व पोलीस ठाणेतील पोलीस अधिकारी/ अंमलदार यांचेसाठी अनैतिक व्यापार संबंधित काम करणाऱ्या वेगवेगळ्या समाजसेवी संघटनांचे प्रतिनिधी (एन.जी.ओ.), कायदे तज्ञ, अनैतिक मानवी वाहतूक कक्ष, मुंबई येथे कार्यरत असलेले अनुभवी पोलीस अधिकारी यांच्यामार्फतीने कार्यशाळांचे आयोजन करून त्यांना पोलीस ठाणे हद्दीतील कार्यान्वित कुंटनखाने, Escorts Service चे वेबसाईटधारक व वेश्यादलाल यांचेविरूध्द परिणामकारक कशा प्रकारे कारवाई कराव्यात याबाबत मार्गदर्शन देण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इस्लामपूर (जि.सांगली) येथे कडकनाथ कोंबडी पालन संस्थेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५४) * १५१४ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इस्मालपूर (जि.सांगली) येथील रयत ॲग्रो संस्थेच्या संस्था चालकांनी सुरु केलेल्या कडकनाथ कोंबडी पालन योजनेमध्ये करोडो रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०२० मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आर्थिक गैरव्यवहारात अडीच लाख रुपयांची फसवणूक झालेल्या प्रमोद जमदाडे यांनी दिनांक १८ जानेवारी, २०२० रोजी विष प्राशन करुन आत्महत्या केली आहे, तसेच उस्मानाबाद जिल्हयातील अनेक शेतकऱ्यांचे या योजनेत अडकलेले पैसे मिळवून देण्याबाबत एका विद्यार्थीनीने मा.मुख्यमंत्री यांना पत्र पाठविले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कारवाई करुन फसवणूक झालेल्यांचे पैसे परत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) कडकनाथ कोंबडी पालन फसवणूक संदर्भात महारयत ॲग्रो कंपनीविरुध्द राज्यात एकूण ११ गुन्हे दाखल असून ४ गुन्हयांमध्ये तपासाअंती मा.न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले आहे. उर्वरित ७ गुन्हयांचा तपास चालू आहे. तसेच, एम.पी.आय.डी. ॲक्ट १९९९ अन्वये महारयत कंपनीचे संचालकांची ०२ स्थावर मालमत्ता संरक्षित करण्यात आल्या असून, एकूण ७४,४३,८००/- रुपयांची जंगम मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## कळंब (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील अवैध मुरुम उत्खनन रोखण्याबाबत

**(५५) * १९६६ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगरुळ (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथील गट नंबर ९३ मधील मूळ मालकीच्या जमिनीतून ५६१ ब्रास मुरुमाचे तसेच मौजे भाट शिरपुरा गावठाण गट नंबर २१० व मौजे मंगरुळ येथील गायरान जमिनीतून ३०६१० ब्रास

मुरुमाचे कळंब-ढोकी-उस्मानाबाद या रस्त्याचे ठेकेदार मे.डी.सी.अजमेरा कन्स्ट्रक्शन या कंपनीने कोणतीही पूर्वपरवानगी न घेता अवैधरित्या उत्खनन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठेकेदाराने शेतकऱ्यांच्या बनावट स्वाक्षऱ्या व अंगठे घेऊन करारनामा तयार करुन अवैधरित्या मुरुमाचे उत्खनन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचेकडे तक्रार केली असता जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी उपअधीक्षक भूमी अभिलेख, कळंब यांना झालेल्या उत्खननाचे ETS प्रणालीव्दारे मोजमाप करुन अहवाल देण्याचे आदेश दिले होते, सदर अहवालानुसार तहसिलदार, कळंब यांनी ठेकेदारास रुपये साडेसात कोटी इतका दंड भरण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ठेकेदाराकडून सदरहू दंड वसूल करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) मौजे मंगरुळ व भाटशिरपूरा ग्रामपंचायत हद्दीतील गावठाण जमिनीतून तसेच मंगरुळ शिवारातील गट नं.९३ मधून मे.डी.सी.अजमेरा या कंपनीने गौण खनिजाचे अवैध उत्खनन केल्याची संबंधित शेतकरी यांची तक्रार जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचे कार्यालयाकडे दिनांक ११/६/२०१९ रोजी प्राप्त झाली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी त्यांच्या दिनांक २१/८/२०१९ च्या पत्रान्वये उपअधीक्षक, भूमी अभिलेख, कळंब यांना सदर ठिकाणी झालेल्या उत्खननाची ई.टी.एस.व्दारे मोजणी करण्याचे कळविले होते. उपअधीक्षक, भूमी अभिलेख, कळंब यांच्या अहवालानुसार मौजे मंगरूळ, ता.कळंब येथील गट नं. ९३, २८१, ३०८ व मौजे भाटशिरपूरा येथील गट नं. २१० या जमिनीतून मे.डी.सी. अजमेरा या कंपनीने एकूण ३०६१०.१९ ब्रास गौण खनिजाचे अवैध उत्खनन केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार तहसिलदार, कळंब यांनी दिनांक २९/११/२०१९ रोजी संबंधित कंपनीविरुध्द रुपये ७,४६,८८,८६३/- इतक्या दंडात्मक रकमेचे आदेश पारीत केले आहेत.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १७६ नुसार संबंधित कंपनीकडून दंडात्मक रक्कम वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेंद्र भागवत**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.